RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर    वर्ष ३४ वे    अंक १५२ वा बुधवार, दिनांक ०३ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक)    पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26    पृष्ठे – ६    मो:९४२२४७२५०२    किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील



संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

# मराठवाड्यातील सगळे मराठे आरक्षणात जाणार–मनोज जरांगे

**मुंबई/प्रतिनिधी** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी २९ ऑगस्टपासून मनोज जरांगे यांनी हजारो मराठा बांधवांसह मुंबईत येत मुंबईतल्या आझाद मैदानावर आंदोलन सुरु केले होते. मनोज जरांगे यांच्या प्रमुख मागण्या होत्या आणि जीआर काढा हे त्यांचे सांगणे होते. ज्यानंतर त्यांच्या लढ्याला यश आले आहे. मनोज जरांगेंनी त्यानंतर उपोषण सोडले आहे. सरकारने जीआर काढल्यानंतर त्यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला. तसंच ते छत्रपती संभाजी नगरलाही पोहचले आहेत. मनोज जरांगे यांनी रुग्णालयातून पत्रकारांशी संवाद साधला आणि त्यांचेही आभार मानले. शिवाय मराठ्यांनी संयम ठेवावा असंही आवाहन केलं.



मराठ्यांच्या प्रश्नांसाठी पत्रकारांनी खूप सहकार्य केले, मदत केली त्याबद्दल सगळ्याचं अभिनंदन करतो आहे. विशेष करुन माझ्या गरीब मराठ्यांनी अखेर ही लढाई जिंकली. अनेक वर्षांपासून ही लढाई सुरु आहे. शेवटी मराठ्यांनी यश त्यांच्या पदरात पाडून घेतले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातल्या सगळ्या मराठ्यांना या आनंदाचे आणि यशाचे श्रेय देतो. मी फक्त नाममात्र आहे सगळे यश त्यांनीच मिळवले असे मनोज जरांगे म्हणाले. मराठावाडा, पश्चिम महाराष्ट्र येथील मराठ्यांनी शब्दांवर विश्वास ठेवा सगळे मराठे आरक्षणात जाणार म्हणजे जाणार यात काही शंका ठेवू नका, फक्त थोडा संयम ठेवा. ज्यांच्या नोंदी नाहीत त्यांना हैदराबाद गॅझेटियरचा आधार असणार आहे. त्यासाठीच त्याचा जीआर निघणं आवश्यक होते. असेही मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. पुढे जरांगे म्हणाले, जो १८८१ पासून जो जीआर नव्हता तो निघाला आहे. मराठ्यांचं हक्काचं गॅझेटिर होतं तरीही एक ओळही नव्हती. आता तो जीआर आला आहे. एखाद्या विदूषक किंवा अविचारी माणसावर विश्वास ठेवून संयम ढळू देऊ नका असे माझे सगळ्यांना माझे सांगणे आहे. सात कोटी गोर गरीब जनता आणि मी आम्ही मिळून निर्णय घेतो.

**काही लोकांचं पोट दुखत आहे–मनोज जरांगे**

काही लोकांचे पोट यासाठी दुखते आहे कारण त्यांचे राजकारण या सगळ्यावर सुरु होते. काहींचे राजकारण यावर होते ते आता कोलमडले आहे. अनेक मराठा बांधवांना वाटते पाटलांनी हे करायला नको होते, मग त्यांना कळते की माझे बोलणे योग्य होते. शांत रहा, संयम ठेवा. सगळे व्यवस्थित होणार आहे. ज्यांच्या नोंदी नाहीत त्यांच्यासाठी तिघांची समिती केली आहे. मराठवाड्याचा मराठा हाच कुणबी आहे यासाठी समिती केली आहे. ज्यांच्याकडे जमीन नाही, त्यांनी कुणाची जमीन बटाईने घेतली असेल त्याचं हमीपत्र देऊन कुणबी प्रमाणपत्र निघणार असेही मनोज जरांगेंनी सांगितलं.

## ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन

**मुंबई/प्रतिनिधी** : ओबीसींच्या प्रश्नाबाबत एका उपसमितीची स्थापना करण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. ओबीसींच्या प्रश्नाबाबत एका उपसमितीमध्ये सहा मंत्री असतील. ही उपसमिती ओबीसी समाजच्या प्रश्नांसंदर्भात ही उपाययोजना सुचवण्याचे काम करणार आहे. ओबीसींच्या प्रश्नाबाबत एका उपसमितीची स्थापना करण्या निर्णय बुधवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या समितीमध्ये



सहा जणांचा समावेश असेल. यामध्ये प्रत्येक पक्षाचे दोन मंत्री असतील. ओबीसी समाजाच्या प्रश्नांसाठी ही समिती काम करेल. अनेक दिवसांपासून अशी समिती स्थापन करावी, असा सरकारचा विचार होता. ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती आजच गठीत होणार. आजच जीआर काढण्यात आला आहे, अशी माहिती गुलाबराव पाटील यांनी दिली.

## महाराष्ट्र रत्न हा समस्त जनतेचा सन्मान: माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचे प्रतिपादन

**उदगीर/प्रतिनिधी** : उदगीर शहरातील विविध गणेश मंडळातील गणेश भक्तांच्या आग्रहाखातर माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी श्री गणेशाची मनोभावे आरती केली व मतदारसंघातील जनतेच्या सुख समाधानासाठी श्री गणरायाकडे साकडे घातले. यावेळी माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचा विविध गणेश मंडळाच्या वतीने लंडन येथे महाराष्ट्र रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.



या सत्काराला उत्तर देताना आमदार संजय बनसोडे म्हणाले की,मागील पाच वर्षाच्या कार्यकाळात मतदार संघाचा सर्वांगीण विकास केला. ही शक्ती केवळ आपल्या मतामुळे मिळाली. गेल्या १० वर्षात मी मतदार संघातील जनतेच्या सुख – सोईसाठी रात्रंदिवस काम केले आहे. त्याची दखल घेवुन मला लंडन येथे महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा माझा सन्मान नसून सर्व मतदार संघातील जनतेचा सन्मान असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.ते उदगीर येथील विविध गणेश मंडळाच्या भेटी दरम्यान मंडळाकडून केलेल्या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, मतदारसंघातील जनतेने दिलेल्या पाठबळामुळेच हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मला मिळाला असून आपल्या सत्कारामुळे मला पुन्हा काम करण्यासाठी ऊर्जा मिळाली आहे. सदर पुरस्कार हा मी माझ्या जनतेला समर्पित करतो अशी भावनाही आ.बनसोडे यांनी व्यक्त केली आहे.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात इंडियन नॉलेज सिस्टीम या विषयावर कार्यशाळेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** : येथील दयानंद शिक्षण संस्थेअंतर्गत चालणाऱ्या दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी इंडियन नॉलेज सिस्टीम या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेला सकाळी १० वाजता सुरुवात होईल. या कार्यशाळेत नवी दिल्ली येथील युजीसीच्या ट्रेनर तथा सिनेट सदस्य डॉ. नीता मोहिते या योगा दर्शन या विषयावर तर ठाण्याच्या आनंद विश्वा गुरुकुल विधी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य ऍड. सुयश प्रधान हे चॅलेंजेस इन प्रोटेक्टिंग ट्रॅडिशनल नॉलेज लिगॅली या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. एकूण दोन सत्रात ही कार्यशाळा संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, कार्यशाळा समन्वयिका डॉ. कविता बियाणी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण आदींनी केले आहे.

## गणेशोत्सव: राज्य महा उत्सव अंतर्गत स्पर्धा व पोर्टलला उदंड प्रतिसाद

### सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांचे अधिक सहभागाचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवास २०२५ पासून राज्य उत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. या राज्य महाउत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धे'चा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला आहे. त्यामुळे यंदा जिल्हा व राज्यस्तरांसोबतच तालुकास्तरीय पारितोषिके देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रभरातील ४०४ मंडळांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला असून स्पर्धेचे परीक्षण सहभागी तालुक्यांत सुरू आहे.



राज्योत्सवाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरलेले घरगुती व सार्वजनिक गणपती बाप्पांचे छायाचित्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल देखील लोकांसाठी व मंडळांसाठी विशेष आकर्षण ठरले आहेत. या पोर्टलद्वारे मोठ्या संख्येने भाविक आपल्या गणपती बाप्पांची छायाचित्रे सर्व गणेशभक्तांच्या दर्शनासाठी अपलोड करत आहेत. या पोर्टलद्वारे आजवर २०० हून अधिक जणांनी आपल्या घरच्या व ७० हून अधिक सार्वजनिक मंडळांनी फोटो अपलोड केले आहेत. घरोघरीच्या बाप्पांचे दर्शन व सार्वजनिक मंडळांच्या बाप्पांचे दर्शन घरबसल्या घेणे यामुळे सर्व गणेशभक्तांना शक्य झाले आहे.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणपती मंदिरे व प्रसिद्ध सार्वजनिक मंडळाच्या गणपतींचे थेट दर्शन जगभरातील गणेशभक्तांना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, याकरिता सुरू करण्यात आलेल्या पोर्टलला देखील गणेशभक्तांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे. या पोर्टलमुळे प्रामुख्याने मुंबईचा लालबागचा राजा, मुंबईचा राजा, खेतवाडीचा गणराज, पुण्याचा दगडूशेठ हलवाई, प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिरातील सिद्धिविनायकाचे दर्शन, अष्टविनायकांचे व टिटवाळ्याच्या गणपतीचे दर्शन एकाच क्लिकवर उपलब्ध झाले आहे. या दोन्ही पोर्टलमुळे जगभरातील गणेशभक्तांना घरबसल्या विविध जिल्ह्यातील व शहरातील गणपतींचे अतिशय सुलभ दर्शन होत आहे.

या उदंड प्रतिसादाबद्दल राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.शेलार यांनी भाविकांचे आभार मानत इतरांनीही ganeshotsav.pldmak.co.in या पोर्टलवर त्वरित छायाचित्रे पाठवून या राज्य महा उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## तिरंगी क्रिकेट स्पर्धेत प्रसाद इलेव्हनचा धमाकेदार विजय!



**लातूर/प्रतिनिधी** : मैत्री क्रिकेट क्लब द्वारा आयोजित दयानंद मैदाना येथे २३ ऑगस्ट ते ३ सप्टेंबरदरम्यान पार पडलेल्या थरारक तिरंगी क्रिकेट स्पर्धेत प्रसाद इलेव्हन संघाने दमदार खेळ करत विजेतेपदावर नाव कोरले. अमोल इलेव्हन, प्रसाद इलेव्हन आणि विशाल इलेव्हन या तीन संघांमध्ये झालेल्या संघर्षपूर्ण लढतींमध्ये विशाल इलेव्हन संघ उपविजेता ठरला. या मालिकेत खेळाडूंनी अप्रतिम कामगिरी करत प्रेक्षकांची वाहवा मिळवली. मालिकावीर हा मान बालाजी घोरबांड यांनी पटकावला, तर सामनावीर किताब दत्ता साळुंके ठरले.

दिवसेंदिवस वाढणाऱ्या क्रिकेटप्रेमाचा उत्साह आणि मैदानावरील खेळाडूंची जिद्द या स्पर्धेमुळे ठळकपणे दिसून आली. दयानंद मैदानावरील हा क्रिकेट उत्सव शहरातील क्रिकेटप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरला.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**मराठा आरक्षणाबाबत हैदराबाद गॅझेट वर पहिला जीआर प्रसिद्ध...**

### चिमटा दयाचा



**वन्य प्राण्याच्या खाण्यासाठी वनविभागाने सोय केली पाहीजे ! सोय नसल्याने शहरी व गावभागात शिरकाव करीत आहेत !!**

## मराठा आरक्षण योध्दे मनोज जरांगे यांच्या लढ्याला यश, लातूर शहरात जल्लोष, पेढे वाटले, फटाके फुटले, निर्णयाचे स्वागत

**लातूर/प्रतिनिधी** : हैदराबाद गॅझेट लागू मराठवाड्यातील मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेट लागू करुन त्याआधारे कुणबी प्रमाणपत्र देण्याची मराठा आरक्षण योध्दे मनोज जरांगे यांची मागणी सरकारने मान्य केल्याच्या तसेच शासन अध्यादेश काढण्याचे जाहीर केल्याच्या निर्णयाचे स्वागत येथील सकल मराठा समाजबांधवांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात गुलाल उधळत व एकमेकास पेढे भरवत फटाक्यांच्या आतिषबाजीने केले.





छत्रपती शिवरायांचा जयजकार, एक मराठा लाख मराठा, मनोजदादा तुम आगे बढो आदी घोषणांनी त्यांनी परिसर दणाणून सोडला होता. सोमवारपासूनच समाजबांधव काहींसे चिंतेत होते. मंगळवारी सकाळी ही चिंता सर्वांच्या चेहऱ्यावर लख्ख दिसत होती. मनोज दादांची प्रकृती त्यात भर घालत होती मात्र दुपारी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, सदस्य तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले व समितीच्या सदस्यांनी जरांगे यांची भेट घेऊन मराठवाड्यासाठी हैदराबाद गॅझेट लागू करीत असल्याची मागणी मान्य केल्याचे जाहीर केले व मराठा समाजबांधवांच्या आनंदाला भरते आले.

काही वेळात लातूर शहरातील समाजबांधव छत्रपती शिवाजी महाराज चौकात जमले व त्यांनी छत्रपती शिवरायांचा जयजयकार करीत मनोज जरांगे यांच्याही नावाने जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन एकमेकांना अलींगण देत जल्लोष साजरा केला. हलगीच्या तालावर नृत्य केले. फटाक्यांची आतिषबाजी केली. एकमेकांना पेढे भरवले. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वातील या मागणीसाठी लातूर जिल्ह्यातील समाजबांधवांनी वेळोवेळी आंदोलने,उपोषणे केली होती. या लढ्यातील सातत्य तसुभरही कमी झाले नव्हते उलट त्याची व्याप्ती वाढत होती.सध्या मुंबई येथील आंदोलनात लातूर जिल्ह्यातील बांधवांचा मोठा सहभाग होता.

आरक्षणाशिवाय समाजाची होत असलेली परवड थांबावी व ते समाजाच्या पदरात पडावे यासाठी त्यांनी जीवाचे रान केले होते. त्यांच्या या कष्टाची फुले झाल्याची भावना यावेळी समाजबांधवांनी व्यक्त केली. आरक्षणाअभावी मराठा समाजाची खूप परवड होत होती. बिकट आर्थिक परिस्थिमुळे शिक्षण घेणे अवघड झाले होते. शिक्षण घेतले तर नौकऱ्याचा प्रश्न होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी आरक्षण हाच समर्थ पर्याय समाजास वाटत होता तो या माध्यमातून मिळाल्याने आपणास समाधान झाल्याची भावना यावेळी समाजबांधवांनी व्यक्त केली. त्यांच्या आठ णीने डोळे डबडबले ही मागणी मान्य व्हावी व समाजाचे भले व्हावे ही सर्वांची इच्छा होती तथापि या ना त्या कारणाने ती प्रत्यक्षात येत नव्हती त्यामुळे हतबल झालेल्या अनेक तरुणांनी ही मान्य करा असा आर्जव करीत मरणाला कवटाळले होते. त्यां सर्वांची आठवण यावेळी समाजबांधवांच्या मनात जागी झाली अन त्यांचे डोळे डबडबले. तुम्ही असे करायला नको होते, तुम्ही आज पाहीजे होतात अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावनेला वाट करुन दिली.

## नायलॉन प्लास्टिक (डबल एस डबल एम) बारदानामध्ये बाजार समितीच्या आवारात माल आणू नये –बाजार समितीचे आवाहन




**लातूर/प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या सूचनेनुसार लातूर बाजार समितीच्या आवारात शेतकरी बांधवांचा विक्रीसाठी येणारा शेतीमाल हा शेतकरी बांधवांनी शेतीमाल नायलॉन / प्लास्टिक (डबल एस डबल एम) या बारदाण्यात आणू नये यांची नोंद घ्यावी व लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीस सहकार्य करावे असे आवाहन लातूर कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती जगदीश बावणे यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पावसाने पाण्याची समस्या मिटली

राज्यात या वर्षी चांगला पाऊस झाला आहे. भर उन्हाळ्यात पाऊस झाला. त्यामुळे पाण्याची कमतरता भासणार नाही. जुन असा कोरडा गेला तसा जुलै महिण्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने नदी, नाले, बंधारे भरले गेले. या पावसाने मोठ्या प्रमाणात शेती व शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. शेतातील खरीपाचे पीके हाती लागेल याचा भरोसा नाही. सोयाबिन जवळपास हातचे गेल्यात जमा आहे. त्या प्रमाणे राज्यात अनेक रस्ते उखडले गेले आहेत. रस्त्यावरील पुल वाहून गेले आहेत. आता रस्त्याची दुरूस्ती करावी लागणार आहे. त्यापेक्षाही शेतीचे झालेले नुकसान भरपाई सरकारकडून मिळाली पाहिजे. शेतीतील पीक हाती लागणार असे वाटत असताना ते पावसाने हिरावुन घेवुन घेतले आहे. पाऊस चांगला पडला असला तरी यापासून काही दुर्घटना घडल्या आहे. जनावरांचे नुकसान झाले. काही ठिकाणी वीज पडली तर काही ठिकाणी माणसे वाहुन गेले तसे जनावरेही वाहून गेली आहेत. पाण्याचा अंदाज खोली न समजल्याने दुर्घटना घडली. वास्तविक हा प्रकार ग्रामीण भागात अधिक दिसून आला. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना विशेष करून मुलांना पोहयाला शिकविले पाहिजे. विहीरीत व नदी-ओढ्यात पोहण्यास शिकले पाहिजे. बऱ्याच घटना ग्रामीण भागात घडतात. निष्काळजीपना भोवत असतो. जनावरे उघड्यावर बांधले जातात, झाडाला बांधले जातात, याचा परिणाम काय होतो तर आकाशातील वीज कोसळली जाते. त्यामुळे दुर्घटना घडली जाते. काळजी घेणे आवश्यक आहे. निष्काळजीमुळे वित्त हानी मोठ्या प्रमाणात होते. निष्काळजीना कधी अंगलट येतो. त्यामुळे सावध वागले पाहिजे. वेळीच सावध असले पाहिजे. बऱ्याच ठिकाणी रस्ते नाहीत म्हणून शेतात जाता येत नाही. वाटरस्ते लहान असतात व शिवरस्ते तयार केले मात्र जाण्यायोग्य नाहीत. सर्वत्र चिखल दिसून येत आहे. अनेकांना बैलपोळ्याच्यावेळी पावसाने शेतात जाता आले नाही. एवढा चिखल साचला आहे. पावसाने रस्ते खराब झाले आहेत. याला दुरूस्तीचा मुहूर्तकधी मिळतो हे सांगता येत नाही. त्यामुळे रस्ते तातडीने दुरूस्त होणे अपेक्षित आहेत. मुळात पावसाने सरकारी कामाची गुणवत्ता उघडी पाडली आहे असे म्हणणे चुकीचे ठरणारे नाही. असो अचानक कधीही या बाबत कल्पना केली नाही एवढा पाऊस झाला आहे. त्यामुळे आगामी काळात अधिक प्रमाणात जलसंधारणाची कामे होणे अपेक्षित आहेत. बंधाऱ्यातील गाळ काढला पाहिजे. वेळीच पाणी साठ्यात कशा प्रकारे वाढ होईल याचा विचार केला पाहिजे. निसर्ग सतत मानवाला साथ देत आला आहे. मानवानेच दुर्लक्ष केले आहे. मानवाने निसर्गाला मित्र बनविले नाही त्यामुळे अप्रिय घटना कमी घडतील. असो पुर्वी शेतीचे कमी नुकसान होईल याकडे लक्ष दिले होते. आलिकडे काय होत आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस कशाला होईल असे म्हणत असताना पाऊस कोसळला आहे. पश्चिम महाराष्ट्र, कोकण भागात अधिक प्रमाणात पाऊस झाला आहे. या भागात दरवर्षी पाऊस पडत असतो, मात्र मराठवाड्यात यापुर्वी अचानक असा पाऊस पडला नाही तेवढा जुलै महिण्यात पडला असल्याने अधिक प्रमाणात पिकाची हानी झाली आहे. पिकाचे नुकसान झाल्याने पंचनामे सुरू होण्याची शक्यता आहे. सरकारने पंचनामे होतील तेंव्हा होतील त्यापुर्वी काही अर्धीतरी मदत शेतकऱ्याच्या खात्यावर जमा करावी. त्यामुळे रब्बीसाठी कामाला येवू शकेल. आता गणपती उत्सव चालू आहे. गावागावात घरोघरी गणपती बसला आहे. त्याचे विसर्जन होताच शेतकरी रब्बीसाठी तयारीला लागणार आहे. रब्बीपिकाला तसे अधिक पाणी लागत नाही. हवामान वातावरणावरच पिक येते. हरभरा, गहु आदि पिक रब्बीचे आहेत. त्यामुळे त्याची तयारी आता करावी लागणार आहे. यासाठी सरकारने झालेल्या नुकसान भरपाई देण्याची गरज आहे. पंचनामे होतीत तेंव्हा होतील. त्यामुळे पुर्ण भरपाई मिळेल तो पर्यंत अर्धी तरी आर्थिक मदतीची गरज आहे. मराठवाड्यात पावसाने मोठे नुकसान केले आहे. जवळपास सर्वच बंधारे भरले आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या नद्या व बंधारे भरले आहेत. त्यामुळे सर्वात मोठा प्रश्न हा पिण्याचा पाण्याचा होता तो मिटला आहे. पाण्याचे नियोजन आता महत्वाचे आहे. पाणी आहे म्हणून कसाही वापर करता कामा नये. पाण्याची नासाडी होता कामा नये. या बाबत नियोजन व वेळापत्रकानुसार चालावे लागणार आहे. तरच वर्षभर पाणी पुरणार आहे. पिण्याचे पाणी एकदा तर मिरज येथून रेल्वेने मागवावे लागले होते. त्यामुळे पाणी किती महत्वाचे आहे हे त्यावेळीच कळले आहे. त्यामुळे पावुस चांगला झाला म्हणून पाण्याचे वाटोळे करू नये. वेळीच दक्षता घेतली तरच वर्षभर पाणी मिळते. अनेक शेतात शेततळे निर्माण केल्याने शेतीत पाणी झिरपते, याचा लाभ विहीरी व विंधन विहीरीच्या पाणी साठ्यात होवू शकते. सर्वात महत्वाचे पाणी आहे. पावसाने चांगले काम केले आहे. शेतीसाठी व पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविला आहे. सरकारने सुद्धा पाण्याची चोरी होवू नये याकडे लक्ष दिले पाहिजे. उपसा विनाकारण होत असेल तर तो रोखला पाहिजे. त्यामुळे पाण्याची साठवणुक होवू शकेल. पाणी नसेल व दुष्काळ पडला तर माणसा बरोबर जनावराचे मोठे हाल होतात. पाण्यामुळे जनावरांना खाण्यायोग्य राणात दिसून येते. आता जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मिटला आहे. शेतीसाठी पाणी व जनावरासाठी चारा ह्या दोन बाबीचा प्रश्न मिटला आहे. त्यामुळे आता एकमेव शेतकऱ्याचे पावसाने झालेल्या नुकसान भरपाईची मदत खात्यावर तातडीने कशा प्रकारे देता येईल याचा विचार केला पाहिजे. पंचनामे होत असतील तर त्याला गती देणे अपेक्षित आहे. बऱ्याच ठिकाणे अजूनही पाणी साचल्याने राणात जाता येत नाही. मोठ्या प्रमाणात खरीपामध्ये सोयाबिनचे नुकसान झाले. त्यात बाजारात सोयाबिनचने दर उतरले आहे. असा दुहेरी फटका बसत आहे. त्यामुळे तातडीने शेतकऱ्यास नुकसान भरपाईची मदत खात्यावर जमा होणे अपेक्षित आहे.

# निलंगा शहरातील रस्त्यांची दाणा दान!

## पालिका प्रशासन व बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

## गणपती विसर्जनापूर्वी रस्ता दुरुस्त करण्याचे शहरवासीयांची मागणी

**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा शहरातील अंतर्गत रस्त्यांची व औरादकडे जाणाऱ्या रस्त्यांची अक्षरशा दाना-दान उडाली असून यात निलंगा नगरपालिका प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असून या दोन्ही प्रशासनावर शहरातील जनतेने तीव्र संताप व्यक्त केला आहे. येणाऱ्या गणेश विसर्जनापर्यंत शहरातील रस्त्यांची उडालेली दाणा-दान थांबून रस्ता दुरुस्त होईल का? असा संतप्त सवाल येथील प्रशासनाला विचारत असून सत्ताधारी व विरोधकांचे या बाबीकडे अक्षम दुर्लक्ष असल्याचे सध्या तरी प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे उघड स्पष्ट झाली आहे.




निलंगा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बँक कॉलनी रस्त्यांची अक्षरशा धूळधाण झाली असून पालिका प्रशासन मधील मुख्याधिकारी तथा प्रशासक यांचे शहरातील रस्ते असो किंवा नाल्या कचऱ्यांचा प्रश्न असो याकडे या प्रशासनाचे जाणून-बुजून दुर्लक्ष झाल्याचे चित्र शिवाजी चौक ते बँकांनी रस्त्याचे उदाहरण हे स्पष्ट आहे.

बँक कॉलनीकडे जाणारे व येणाऱ्या वाहनांची संख्या लक्षणीय असून यात पादचारी जाणाऱ्या लोकांची ही संख्या भरीव असून येथील जाणाऱ्या वाहनास लोकांनाही आपला जीव मोठे घेऊन मार्गस्थ व्हावे लागत असल्याचे चित्र हे या रस्त्यावरून दिसून येत आहे.

त्याच रस्त्यासोबत शिवाजी चौक ते कासार शिरसी मोड पर्यंत या मार्गावरील रस्त्याची दाणादाण उडाली असून एबी वाईन शॉप च्या जवळच मौत का कुवा असल्यासारखा भला मोठा खड्डा पडला आहे. हा खड्डा पास करताना मोठमोठ्या वाहनांना फार मोठी कसरत करावी लागत आहे.

अवघ्या पाच महिन्यापूर्वीच या मार्गाचे काम करण्यात आले होते मात्र अवघ्या पाच महिन्यातच या रस्त्याचे दाना दान उडाली असून हे काम केलेल्या गुत्तेदारावर बांधकाम विभाग कारवाई करणार का? असा सवाल ही शहरातील जनता विचारत असून गुत्तेदार व प्रशासन जगवण्याचा हा एकमेव प्रकार असल्याचा या निकृष्ट दर्जाच्या केलेल्या रस्त्यावरून दिसून येत आहे.

बांधकाम विभाग रस्ता दुरुस्त करणार का? अथवा या पडलेल्या खड्ड्यातून एखाद्याचा बळी गेल्यावर रस्ता दुरुस्त होणार याची प्रतीक्षा वाहनधारकासह जनतेलाही पडली आहे.

या दोन्ही विभागाच्या माध्यमातून केलेले कामांचा दर्जा एक वर्षीही टिकून राहत नसल्याने यात नेमकं कुणाचे हित दडलय. हेच गुप्त कळत न करण्यासारखे झाले आहे.

निलंगा शहरातील सर्वाधिक मोठी वस्ती म्हणून बँकांनी, लोंढे नगर, आनंदनगर, कृष्णा नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, अशा अनेक नगरवासी यांचे रहिवासी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बँक कॉलनी रस्त्यावर हजारो वाहनांच्या वरदळीसह पादचारी लोकांची संख्याही खूप मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने वाहनधारकासह सर्वसामान्य जनतेला या रस्त्यावरून चिखलातून मार्ग काढताना खूप मोठा त्रास सहन करावा लागत असून गणपती विसर्जनापूर्वी चिखल मातीने माखलेला रस्ता व त्यात हजारो पडलेले खड्डे पालिका प्रशासन लवकर दुरुस्त करतील का? असा प्रश्न शहरातील सुजाण नागरिक करीत असून हा लवकरात लवकर रस्ता दुरुस्त करून नागरिकांना दिलासा द्यावी अशी मागणी जनता करीत आहे.

# इतिहास, भूगोल आणि प्रेरणादायी वारसा : किल्ले शिवनेरी

सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेला शिवनेरी किल्ला केवळ एक किल्ला नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय स्मृतीचिन्ह आहे. जुन्नर शहराच्या उत्तरेला उभा असलेला हा गड जणू त्या भूमीचा रक्षक बनून शतकानुशतके उभा आहे. इथे प्रत्येक दगड, प्रत्येक कडा, प्रत्येक तट इतिहासाची गाथा सांगतो.

इ.स. सहाव्या शतकापासून अस्तित्वात असलेला शिवनेरी किल्ला महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. सुरुवातीला हा किल्ला एक महत्त्वाचा लष्करी ठाणे म्हणून उभारण्यात आला होता. अनेक राजवटींनी या किल्ल्यावर आपले वर्चस्व गाजवले. मात्र, भोसले घराण्याच्या काळात याला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

१५९५ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्या ताब्यात हा गड आला. याच ठिकाणी, १९ फेब्रुवारी १६३० रोजी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. या किल्ल्याच्या साक्षीने त्यांचे बालपण घडले. ज्या किल्ल्यावर एका युगपुरुषाने पहिला श्वास घेतला, तो किल्ला स्वाभाविकच असामान्य तेज आणि पावित्र्य लाभलेला ठरतो. बालवयातच त्यांनी राज्यकारभार, युद्धकला आणि मुत्सद्देगिरीचे धडे येथेच गिरवले.

शिवनेरीचा निसर्गसंपन्न परिसर, मजबूत तटबंदी आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून केलेली रचना पाहिल्यास शहाजी राजांनी हा किल्ला निवडण्यामागचे महत्त्व लक्षात येते. शिवनेरीवर झालेल्या संस्कारांमुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली.

शिवनेरीचे महत्त्व केवळ त्याच्या संरक्षणात्मक रचनेत नाही तर त्याच्या सामरिक स्थानातही दडलेले आहे. नाणेघाट आणि माळशेज घाट या प्राचीन व्यापारी मार्गांवर नजर ठेवणाऱ्या या किल्ल्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांना व्यापारावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य

**संजय डी. ओरके**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

होत असे. सातवाहनांच्या काळापासून या घाटखिंडी पश्चिम किनाऱ्यावरील समृद्ध बंदरांना देशाच्या आतील प्रदेशाशी जोडत होत्या. त्यामुळे या परिसरावर नियंत्रण म्हणजे व्यापार, सत्ता आणि सामरिक बळ या तिन्ही गोष्टींवर पकड मिळविणे होय. म्हणूनच, पुढे कुठलाही राजवंश आला तरी शिवनेरीवर नियंत्रण मिळवणे हे त्यांच्यासाठी अनिवार्यच होते.

शिवनेरीची रचना ही युद्धकौशल्याचे अद्वितीय उदाहरण आहे. डोंगरकड्यांचे नैसर्गिक बळ आणि त्याला जोडलेली भक्कम चिरेबंदी, तटबंदी यामुळे हा किल्ला जवळपास अभेद्यच मानला जात असे. साधारणपणे साडेतीन हजार फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी सात दरवाज्यांतून जावे लागते. हे दरवाजे वळणदार व गुंतागुंतीच्या पद्धतीने बांधलेले असल्यामुळे शत्रू गोंधळून जाई, त्याचा वेग मंदावला जाई आणि मग गडावरून हल्ला चढविणे सोपे होई.

किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर एक विस्तीर्ण पठार दिसते. त्यात निवासासाठी घरे, धान्यसाठ्याची कोठारे, तसेच प्रस्तरात खोदलेली पाण्याची मोठी टाकी आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेत किंवा शत्रूच्या दीर्घकाळ चालणाऱ्या वेढ्यातही या पाणीसाठ्यामुळे गडाची स्वायत्तता टिकून राहायची. किल्ल्याच्या उत्तरेला 'कडेलोट' नावाचा उग्र कडा आहे, जिथून शत्रूंना खाली फेकले जात असे.

किल्ल्याच्या आत शिवाई देवीचे मंदिर आहे. शिवनेरी हा केवळ सैन्यदृष्ट्या महत्त्वाचा गड नाही, तर धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही पूज्य मानला जातो.








आजही शिवनेरी महाराष्ट्राच्या लोकमानसात अपार आदराचे स्थान राखतो. दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हजारो शिवभक्त, शाळकरी मुले, इतिहासप्रेमी व पर्यटक या दिवशी गडावर एकत्र येतात. शिवनेरीचा गगनभेदी निनाद त्यांना धैर्य, शौर्य आणि स्वराज्याच्या विचारांनी प्रेरित करतो.

शिवनेरी किल्ल्याचा प्रवास केवळ ऐतिहासिक सफर नसून, त्याच्या आसपासच्या परिसरात अनेक अद्भुत ठिकाणे आहेत. इथे इतिहास, अध्यात्म आणि निसर्गसौंदर्य यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. किल्ल्यापासून अवघ्या पाच किलोमीटरवर लेण्याद्री लेण्या आहेत. या प्राचीन बौद्ध लेण्या उत्कृष्ट शिल्पकलेचे दर्शन घडवतात. याच गुंफांमध्ये असलेले गिरीजात्मज मंदिर अष्टविनायकांपैकी एक असून, गणेशभक्तांसाठी हे पवित्र स्थळ आहे. गुंफांपर्यंतच्या चढाई दरम्यान दिसणारे विस्तीर्ण निसर्गदृश्य मन मोहून टाकते.

शिवनेरीपासून दहा किलोमीटरवर असलेली ओझर आणि गिरीजात्मज गणपती मंदिरे भक्तांसाठी विशेष आकर्षण आहेत. विघ्नहर गणेशाला समर्पित असलेले ओझर मंदिर देखण्या वास्तू कलेसाठी प्रसिद्ध आहे. इथली शांत आणि भक्तिमय वातावरण प्रार्थनेसाठी पोषक आहे. निसर्ग प्रेमींसाठी माळशेज घाट हे रमणीय स्थळ शिवनेरीपासून तीस किलोमीटरवर आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, वाहणारे धबधबे आणि जैव विविधतेने नटलेला परिसर इथे पाहायला मिळतो. पावसाळ्यात तर हा संपूर्ण प्रदेश हिरव्यागार शालूत नटतो. साहस प्रेमींनी नाणेघाटाला भेट द्यायलाच हवी. हा प्राचीन व्यापारी मार्ग आणि ट्रेकिंगचे प्रसिद्ध ठिकाण पस्तीस किलोमीटरवर आहे. इथल्या कोरीव शिला लेखांमधून शतकांपूर्वीच्या व्यापाऱ्यांच्या आठवणी जपल्या गेल्या आहेत. नाणेघाटातून सह्याद्री पर्वतरांगांचे विस्मयकारक दृश्य दिसते. केवळ सहा किलोमीटरवर जुन्नर लेण्या आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी कोरलेल्या या बौद्ध लेण्यांमध्ये चैत्यगृह आणि विहारांचा समावेश आहे. कोरीव नक्षीकाम, प्राचीन काळातील भिक्षूंचे वास्तव्य आणि शिल्पकला यामुळे हे ठिकाण विशेष आहे. इतिहास, अध्यात्म आणि निसर्ग यांचा सुंदर मिलाफ असलेल्या शिवनेरी आणि त्याच्या आजूबाजूच्या ठिकाणांना भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरतो.

युनेस्कोच्या जागतिक वारसा मानांकन यादीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, शिवनेरीलाही त्या सन्माननीय श्रेणीमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे शिवनेरीला जागतिक स्तरावरही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

खरे तर, शिवनेरी हा केवळ दगड आणि मातीचा किल्ला नाही तर तो आहे धैर्याचा स्रोत, चारित्र्याचा आधार आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक. शिवनेरी किल्ला हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून महाराष्ट्राच्या अभिमान, शौर्य आणि परंपरेचे प्रतीक आहे. इतिहासप्रेमी, ट्रेकिंगसाठी उत्सुक किंवा संस्कृतीचा अभ्यास करणारे पर्यटक इथे एक अद्वितीय अनुभव घेऊ शकतात. किल्ल्याच्या भव्यतेचा अनुभव घेत असताना, त्या महान युगाचा साक्षीदार होण्याची संधी लाभते, ज्या काळाने भारताच्या भवितव्याला आकार दिला. इथल्या सुळक्यांवर उभे राहून सह्याद्रीच्या विस्तीर्ण रांगांचे सौंदर्य डोळ्यांत साठवता येते. शिवनेरीचा प्रत्येक दगड, प्रत्येक तटबंदी आणि प्रत्येक वाट इतिहासाचे सोनेरी पान उलगडते.

# स्वावलंबी शिक्षणाचे प्रणेते: डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

महाराष्ट्र ही संतांची तसेच समाजसुधारकांची भूमी आहे. महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक होवून गेले. त्यांनी आपल्या कार्यानी सामाजिक विकास करुन समाज परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरु करुन स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. फुले दांपत्या नंतर शिक्षण क्षेत्रात कार्य करणारे महान समाजसुधारक म्हणजे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील होते. भाऊराव पाटील विद्यार्थी जीवनापासूनच विविध सामाजिक चळवळीत सहभागी होत. ते महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे एक सक्रिय कार्यकर्ते होते. तसेच त्यांच्या जीवनावर महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार सरणीचा जबरदस्त प्रभाव होता. विद्यार्थी जीवनापासूनच त्यांना सामाजिक कार्याची आवड होती.

शिक्षण संपल्यानंतर सुरुवातीच्या काळात भाऊराव पाटलांनी किर्लोस्कर बंधू व ओगले बंधू यांच्याकडे विक्री प्रतिनिधी म्हणून काही वर्षे काम केले. हे काम करत असताना त्यांना गावोगावी , वस्ती, तांड्यावर फिरावे लागत असे. गावोगावी फिरत असताना समाजातील विषमता, मागासलेपण, निरक्षरता या विविध सामाजिक समस्यांची त्यांना जाणीव झाली. यावर शिक्षण हाच एकमेव पर्याय आहे असे त्यांना वाटू लागले. तेव्हा पासूनच त्यानी समाजातील मागास तसेच शिक्षणापासून वंचित घटकांना शिक्षण देण्याचे ठरवले. समाजातील गरीब, कामगार, मागासवर्गीय व कष्टकरी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच्या उद्दात हेतूने भाऊराव पाटलांनी १९१९ मध्ये सातारा जिल्ह्यातील काले या ठिकाणी रयत शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. रयत शिक्षण संस्थे अंतर्गत शाळा, वस्तीगृह, महाविद्यालये सुरु केली. भाऊरावाना नेहमी वाटायचे शिक्षण केवळ अक्षरज्ञान नसून ते आत्मनिर्भरतेचे साधन आहे. रयत शिक्षण संस्थेचा प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे. तसेच तो समाजात टिकला पाहिजे. तो आत्मनिर्भर झाला पाहिजे असे भाऊरावाना नेहमी वाटायचे. या त्यांच्या विचारसरणीतून स्वावलंबी शिक्षण ही संकल्पना पुढे आली. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद हे संस्थेचे ब्रीद वाक्य पुढे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवनकार्य सर्वांसाठी शिक्षण व श्रमाला मान किंवा प्रतिष्ठा या तत्वावर आधारीत होते. सर्वांसाठी शिक्षण यासाठी भाऊराव पाटील यांनी खेडोपाडी, गावोगावी शाळा सुरु केल्या तसेच विद्यार्थी वस्तीगृह सुरुवात केली. बरेचसे विद्यार्थी वस्तीगृहात राहू लागली , शिकू लागली. शिक्षणाच्या प्रवाहात येवू लागली. सकारात्मक बदल घडवून येवू लागला. हे घडत असताना भाऊराव पाटलांना असे लक्षात आले की, बरेचसे विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू लागली आहेत. अशा विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने शिक्षणाच्या प्रवाहात आणता येईल याचा ते विचार करू लागले. त्यातून स्वावलंबी शिक्षण ही संकल्पना पुढे आली. स्वावलंबी शिक्षण या संकल्पनेमुळे विद्यार्थी स्वाभिमानी बनतील व त्यांच्या मध्ये श्रमप्रतिष्ठा, चिकाटी, आत्मविश्वास, समर्पित भावना, निष्ठा हे गुण विकसित होतील. या उद्देशाने स्वावलंबी शिक्षण भाऊरावांनी प्रत्यक्ष सुरु केले. प्रत्येक विद्यालयात, महाविद्यालयात कमवा व शिका योजना ( ) सुरु केली. हजारो विद्यार्थी या योजनेत सहभागी होवू लागले. विद्यालयाने, महाविद्यालयाने ठरवून दिलेली कामे (हस्त कौशल्य, बागकाम, कार्यालयीन कामात मदत, वाचनालयातील पुस्तकांची बांधणी) विद्यार्थी करु लागले. कमवा व शिका योजनेचे सकारात्मक परिणाम दिसू लागले. विद्यार्थी शिकत असताना पैसा मिळू लागला. ते आपल्या शिक्षणासाठी हातभार लावू लागले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची जिद्द निर्माण झाली. व्यवहारी दृष्टिकोन विकसीत होवू लागला. शिक्षणाशिवाय आपणास पर्याय नाही हे त्यांच्या लक्षात येवू लागले. श्रमप्रतिष्ठा निर्माण होवू लागली.

स्वावलंबी शिक्षण या संकल्पनेमुळे समाजातील सर्व घटक शिक्षण घेवू लागले. शिक्षण हे केवळ धनिक लोकांनी मक्तेदारी राहिली नाही. स्वावलंबी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारिक कामाचा अनुभव मिळाला. त्यामुळे ते आत्मनिर्भर, कुशल, व्यवहारी तसेच समाजाभिमुख बनू लागले. स्वावलंबी शिक्षणाचे महत्त्व सामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले. भाऊराव पाटील यांनी सुरुवात केलेली स्वावलंबी शिक्षण ही संकल्पना केवळ एक पद्धत नव्हती तर ती एक सामाजिक चळवळ होती. त्यांच्या स्वावलंबी शिक्षण या संकल्पनेतून '' श्रमाला कमीपणा नसतो, शिक्षणासाठी श्रम करणे हाच खरा अभिमान असतो.'' हे संस्कार विद्यार्थ्यांना मिळाले. हे संस्कार मूल्य आजच्या काळातही खूप महत्त्वाचे आहेत. बेरोजगारी, गरिबी, सामाजिक विषमता, आर्थिक विषमता दूर करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांची स्वावलंबी शिक्षण ही संकल्पना आदर्श तसेच उपयुक्त आहे.

सारांश, डॉ. भाऊराव पाटील हे खऱ्या अर्थाने स्वावलंबी शिक्षणाचे प्रणेते होते. त्यांच्या स्वावलंबी शिक्षणाच्या संकल्पनेमुळे व कार्यामुळे ग्रामीण तसेच वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली झाली. स्वावलंबी शिक्षण ही योजना खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील शैक्षणिक क्रांती होती. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्वावलंबी शिक्षण हे केवळ व्यक्ती घडवणारे नव्हते, तर समाज परिवर्तन घडवणारे महान तत्वज्ञान होते. २०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणामधील संलग्नता, बहुशाखीय, कौशल्याभीमुख, अनुभवाधारीत शिक्षण या संकल्पना म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वावलंबी शिक्षणाच्या विचाराची आधुनिक किंवा सुधारीत आवृती म्हणता येईल. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक योगदान हे संस्थाबांधणीपुरते मर्यादित नव्हते ते मूल्याधिष्ठित, श्रमसंस्कारित आणि सर्वसमावेशक शिक्षण तत्वज्ञान आहे. आजही रयत शिक्षण संस्थेच्या सर्व विद्यालयात तसेच महाविद्यालयात कमवा व शिका योजना चालू आहे. आजही हजारो विद्यार्थी या योजनेत सहभागी होवून आपले शिक्षण पूर्ण करत आहेत. महाराष्ट्रातील इतर सर्व शाळा, महाविद्यालयात कमवा व शिका योजना चालू करुन शिक्षणाला आत्मनिर्भरतेची जोड द्यावी व समाजपरिवर्तन करण्यासाठी प्रयत्न करावेत. डॉ .कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्वावलंबी शिक्षणाचे विचार आपण आत्मसात करुन अंगीकारणे हेच त्यांना विनम्र अभिवादन ठरेल.

**लेखक कैलास रामचंद्र बिडवे**
यशवंतराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय , गाधवड (लेखक रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत)



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### मिचेल स्टार्क पाठोपाठ आणखी एका खेळाडूची निवृत्ती! पाकिस्तान क्रिकेटचे मानले आभार, काय म्हणाला?

नवी दिल्ली–ऑस्ट्रेलियाचा स्टार स्विंग बॉलर मिचेल स्टार्क याने टी–ट्वेंटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. टेस्ट क्रिकेट आणि वनडे वर्ल्ड कपवर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्टार्कने निवृत्ती घेतली आहे. पुढच्या वर्षी होणाऱ्या टी–ट्वेंटी वर्ल्ड कपआधी स्टार्कने निवृत्ती घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अशातच आता स्टार्क पाठोपाठ आणखी एका खेळाडूने निवृत्ती जाहीर केली आहे.पाकिस्तानी फलंदाज आसिफ अलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. आपल्या ७९ आंतरराष्ट्रीय व्हाईट–बॉल मॅचच्या करिअरमध्ये, आसिफ अलीला त्याच्या बेफिकीर फलंदाजीसाठी अनेकदा टीकेचा सामना करावा लागला. ३३ वर्षांच्या आसिफने पाकिस्तानसाठी ५८ टी–ट्वेंटी आणि २१ एकदिवसीय मॅच खेळल्या. त्याची सर्वात अविस्मरणीय खेळी २०२१ च्या टी–ट्वेंटी वर्ल्ड कपमध्ये अफगाणिस्तानविरुद्ध होती, जिथे त्याने फक्त सात बॉलमध्ये २५ धावा करून पाकिस्तानला विजय मिळवून दिला होता.

ट्विटरवर आपल्या निवृत्तीची घोषणा करताना आसिफ म्हणाला, मफ्फ्पाकिस्तानची जर्सी घालणे हा माझ्यासाठी सर्वात मोठा सन्मान होता. देशासाठी खेळणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात अभिमानाचा क्षण होता.फ्फ त्याने आपल्या कुटुंबीयांचे आणि मित्रांचे आभार मानताना म्हटलं की, मफ्फ्जे माझ्या सुखदु:खात माझ्यासोबत उभे राहिले, विशेषत: वर्ल्ड कपच्या वेळी जेव्हा मी माझ्या मुलीला गमावले, तेव्हा तुमची साथच माझ्यासाठी ताकद बनली.फ्फ आसिफने टी–ट्वेंटी मध्ये एकूण ५७७ धावा केल्या, ज्यात २०१८ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध ४१ धावा ही त्याची सर्वोच्च धावसंख्या होती. एकदिवसीय मॅचमध्ये त्याने ३८२ धावा केल्या, ज्यात २१ सिक्स आणि २२ फोरचा समावेश आहे. त्याचा शेवटचा एकदिवसीय मॅच २०२२ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध झाला, तर त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय मॅच २०२० च्या आशिया गेम्समध्ये होता.

***

### बांगलादेशबद्दलचा तो निर्णय टीम इंडियाला महाग पडणार! आशिया कपआधी वाढले कॅप्टन सूर्याचे टेन्शन

मुंबई–९ सप्टेंबरपासून युएईमध्ये आशिया कपला सुरूवात होणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय टीमची घोषणाही करण्यात आली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात टीम इंडिया या स्पर्धेत खेळणार आहे. पुढच्या वर्षी भारतात होणाऱ्या टी–२० वर्ल्ड कपची तयारी म्हणून आशिया कपकडे पाहिलं जात आहे, कारण टी–२० वर्ल्ड कपआधी टीम इंडियाला फार मॅच खेळण्याची संधी मिळणार नाही, पण या स्पर्धेआधी टीम इंडिया आणि कर्णधार सूर्यकुमार यादवचं टेन्शन वाढलं आहे.टीम इंडियाने यावर्षी शेवटचा टी–२० सामना फेब्रुवारी महिन्यात खेळला होता, यानंतर भारतीय खेळाडू आयपीएलमध्ये वेगवेगळ्या टीमकडून टी–२० मॅच खेळले, पण आता आयपीएल संपूनही तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे, त्यामुळे भारतीय खेळाडूंची मॅच प्रॅक्टिस झालेली नाही. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवही शस्त्रक्रियेनंतर पहिल्यांदाच मैदानात उतरणार आहे.बांगलादेशबद्दलचा निर्णय महागात पडणार? खरंतर टीम इंडिया ऑगस्ट महिन्यात बांगलादेशच्या दौऱ्यावर जाणार होती. या दौऱ्यात ३ वनडे आणि ३ टी–२० मॅचची सीरिज होणार होती, पण भारत–बांगलादेश यांच्यातल्या बिघडलेल्या संबंधांमुळे ही स्पर्धा सप्टेंबर २०२६ पर्यत पुढे ढकलण्यात आली. टीम इंडिया बांगलादेश दौऱ्यावर गेली असती, तर त्यांना आशिया कपआधी पुरेशी मॅच प्रॅक्टिस मिळाली असती.

दुसरीकडे आशिया कपमध्ये खेळणाऱ्या बहुतेक टीम या मैदानामध्ये दिसत आहेत. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि युएई यांच्यामध्ये टी–२० ट्रॅन्युलर सीरिज सुरू आहे, तर दुसरीकडे श्रीलंका झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर गेली आहे. या दौऱ्यातल्या २ वनडेमध्ये श्रीलंकेचा विजय झाला असून ३ टी–२० मॅचची सीरिज बुधवारपासून सुरू होणार आहे.आशिया कपसाठी पाकिस्तान, अफगाणिस्तान, युएई आणि श्रीलंका या टीम मॅच प्रॅक्टिससह मैदानात उतरणार आहेत, दुसरीकडे भारतीय खेळाडू मात्र मोठ्या विश्रांतीनंतर कमबॅक करणार आहेत, त्यामुळे ही विश्रांती टीम इंडियासाठी धोक्याची ठरू नये, अशीच अपेक्षा चाहत्यांना आहे.

***

### जादूगार राशिद खानने टी–२० क्रिकेटमध्ये रचला इतिहास

दिल्ली–अफगाणिस्तानचा फिरकी जादूगार राशिद खान याने टी–२० क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला आहे. या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज बनण्याचा मान आता त्याच्या नावावर जमा झाला आहे. यूएईविरुद्धच्या त्रिकोणी मालिकेतील सामन्यात त्याने ही ऐतिहासिक कामगिरी साध्य केली. या सामन्यात राशिदने आपल्या ४ षटकांत २१ धावा देत ३ विकेट घेतल्या आणि अफगाणिस्तानच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. अफगाणिस्तानने हा सामना ३८ धावांनी जिंकला. टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत आता राशिद खान पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याच्या नावावर ९८ सामन्यांत १६५ विकेट्स आहेत. त्याने न्यूझीलंडच्या टिम साउदीला मागे टाकले.

## भारतीय हॉकी संघाचा कझाकिस्तानविरुद्ध बलाढ्य विजय



**नवी दिल्ली :** भारताच्या हॉकी संघाने सुरु असलेल्या आशियाई कप हॉकी टुर्नामेंटमध्ये कझाकिस्तानच्या पार चिंधड्या उडविल्या आहेत. सुपर–४ मध्ये आपली जागा निश्चित करताना भारतीय संघाने एकामागोमाग एक १५ गोल मारले आहेत. तर कझाकिस्तानला एकही गोल करता आलेला नाही.

या विजयाने भारताने अ गटातील अव्वल स्थान गाठले आहे. अभिषेक (५वे, ८वे, २०वे आणि ५९वे मिनिट), सुखजीत सिंग (१५वे, ३२वे, ३८वे), जुगराज सिंग (२४वे, ३१वे, ४७वे), कर्णधार हरमनप्रीत सिंग (२६वे), अमित रोहिदास (२९वे), राजिंदर सिंग (३२वे), संजय सिंग (५४वे), दिलप्रीत सिंग (५५वे) यांनी हे गोल केले.पहिल्या क्वार्टरमध्ये तीन गोल, दुर्सयामध्ये चार गोल करत मध्यार्धापर्यंत सात गोलांची आघाडी मिळिवली होती. एकामागोमाग एक गोल होत असल्याने कझाकिस्तानचे मनोबल पुरते ढासळलेले होते. भारतीय संघाने याचा फायदा उर्वरित खेळात घेत आणखी आठ गोल केले. यामुळे अभिषेक, सुखजीत आणि जुगराज या तिघांनीही हॅटट्रीक नोंदविली आहे.या चषकात भारतीय संघाने चीन आणि जपानला देखील नमविले आहे.

या स्पर्धेत जिंकणारा संघ बेल्जियम आणि नेदरलँड्स संयुक्तपणे आयोजित होर्णाया हॉकी वर्ल्डकपमध्ये सहभागी होणार आहे. यामुळे भारतासाठी हा चषक खूप महत्वाचा आहे. पाकिस्तानने आधीच या स्पर्धेतून माघार घेतली आहे.

## माजी क्रिकेटपटू रॉबिन उथप्पाने विराट कोहलीबाबत मोठा खुलासा केला आहे. नेमकं काय म्हणाला?



**नवी दिल्ली :** भारतीय संघाला २०१९ वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील सेमीफायनलच्या सामन्यात न्यूझीलंडकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. या स्पर्धेत विराट कोहली भारतीय संघाचा कर्णधार होता. या स्पर्धेत भारतीय संघाने घेतलेला एक निर्णय तुफान चर्चेत राहिला होता, तो म्हणजे अंबाती रायुडूला बाहेर ठेवून विजय शंकरला संघात स्थान देण्याचा निर्णय. त्यावेळी अंबाती रायुडू दमदार फॉर्ममध्ये असूनही थ्री डी प्लेअर म्हणून विजय शंकरचा संघात समावेश करण्यात आला होता. या निर्णयावरून विराट कोहलीवर जोरदार टीका करण्यात आली होती.

एका पॉडकास्टमध्ये बोलताना भारताचा माजी खेळाडू रॉबिन उथप्पाने विराटने घेतलेल्या निर्णयावर जोरदार टीका केली होती. त्यामुळे विराटशी असलेले चांगले संबंध बिघडल्याचा खुलासा रॉबिन उथप्पाने एका मुलाखतीत केला आहे. उथप्पाने रायुडू आणि युवराजला संघात स्थान न दिल्यामुळे देखील नाराजी व्यक्त केली होती. भारतीय संघात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी अंबाती रायुडूला प्रबळ दावेदार मानलं जात होतं. मात्र त्याच्या नावाची चर्चा असतानाही विजय शंकरच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं होतं. तर युवराज सिंगला देखील दुर्लक्ष करण्यात आलं होतं. त्यामुळे त्याने २०१९ मध्ये फेअरवेल सामना न खेळताच निवृत्तीची घोषणा केली होती.

अलीकडेच उथप्पाने याबाबत मोठा खुलासा केला आहे. आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना त्याने स्पष्ट केलं आहे की, त्याला विराट कोहलीवर टीका करायची नव्हती. त्यावेळी त्याने मुलाखतीत बोलताना फक्त त्या प्रश्नाचं उत्तर दिलं. त्यामुळे पुढे जाऊन विराटसोबत असलेले संबंध बिघडतील याचा त्याने विचार केला नव्हता. त्याने विराटबद्दल राष्ट्रीय टेलिव्हिजनवर कुठलंही वक्तव्य करताना आधी विराटसोबत चर्चा करायला हवी होती. पण त्याने तसं काहीच न करता, मुलाखत दिली हा त्याच्यासाठी सर्वात मोठा धडा होता,असं त्याने सांगितलं. विराट कोहली आणि रॉबिन उथप्पा दोघेही खूप चांगले मित्र आहेत. बरेच वर्ष दोघेही एकत्र भारतीय संघासाठी खेळले. रॉबिन उथप्पा हा २००७ टी–२० वर्ल्डकपविजेत्या संघातील खेळाडू आहे. उथप्पाने विराट कोहलीआधी भारतीय संघासाठी पदार्पण केलं होतं. मात्र, या मुलाखतीनंतर दोघांमध्ये असलेले संबंध बिघडले होते. त्यावेळी त्याला कुठे काय बोलावं याचं महत्वं कळालं होतं.

## टीम इंडियाविरूद्ध होणाऱ्या मालिकेतून संघातील प्रमुख खेळाडू बाहेर





**नवी दिल्ली :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणाऱ्या वनडे मालिकेआधी ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला आहे.

येणारे काही महिने ऑस्ट्रेलिया संघासाठी अतिशय महत्वाचे असणार आहेत. कारण या कालावधीत काही ऑस्ट्रेलियाचा संघ काही महत्वाच्या मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. ऑक्टोबरमध्ये भारताचा संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेत दोन हात करणार आहे. या मालिकेआधी ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियाचा वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार पॅट कमिन्स दुखापतीमुळे भारत आणि न्यूझीलंडविरूद्ध होणाऱ्या मालिकेतून बाहेर पडला आहे. तर त्याच्या अ‍ॅशेस मालिकेत खेळण्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

वेस्टइंडिज दौऱ्यावर गोलंदाजी करत असताना पॅट कमिन्सला पाठीच्या दुखण्याचा त्रास जाणवला होता. वैद्यकीय तपासणीत पाठीच्या खालच्या भागात ताण आल्याचे स्पष्ट झाले. अ‍ॅशेस मालिका ही ऑस्ट्रेलियासाठी अतिशय महत्वाची आहे. ऑस्ट्रेलियाला जर अ‍ॅशेस मालिका जिंकायची असेल, तर पॅट कमिन्स पूर्णपणे फिट असणं गरजेचं आहे. त्यामुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाचा पूर्णपणे प्रयत्न असणार आहे की, कमिन्स तोपर्यंत पूर्णपणे असायला हवा.ऑस्ट्रेलियाला टी–२० वर्ल्डकपपूर्वी मोठा धक्का, मिचेल स्टार्कची टी–२०मधून अचानक निवृत्तीची घोषणा; काय आहे कारण?

येत्या २०२७ मध्ये वनडे वर्ल्डकप स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेच्या दृष्टीने भारत आणि न्यूझीलंडविरूद्ध होणारी मालिका अतिशय महत्वाची असणार आहे. पण तो या मालिकेला मुकणार आहे. पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली खेळताना ऑस्ट्रेलियाने अनेक महत्वाच्या सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. २०२१ मध्ये त्याच्याकडे कसोटी संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. यादरम्यान त्याने ऑस्ट्रेलियाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेचं जेतेपद मिळवून दिलं. स्पर्धेच्या या हंगामातही त्याने ऑस्ट्रेलियाला अंतिम फेरीत पोहोचवलं होतं. कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर, केवळ २ सामने तो दुखापतीमुळे खेळू शकलेला नाही. मात्र अ‍ॅशेस मालिकेतील सर्व सामन्यांमध्ये तो संघाचा भाग होता.या खेळाडूला मिळू शकते नेतृत्वाची जबाबदारी आगामी अ‍ॅशेस मालिकेतील पहिला कसोटी सामना पर्थच्या मैदानावर होणार आहे. या सामन्यासाठी जर कमिन्स पूर्णपणे फिट नसेल, तर ही जबाबदारी स्टीव्ह स्मिथकडे सोपवली जाऊ शकते. तर कमिन्सच्या अनुपस्थितीत स्कॉट बोलँडचा संघात समावेश केला जाऊ शकतो. स्मिथ पुन्हा एकदा ऑस्ट्रेलियाचं नेतृत्व करताना दिसू शकतो. याआधी देखील श्रीलंकेविरूद्ध तो ऑस्ट्रेलियाचं नेतृत्व करताना दिसून आला

## हुक्का पिणाऱ्यांचे टीम इंडियात सिलेक्शन? धोनीच्या कॅप्टन्सीचे डार्क सिक्रेट, पठाणने सगळेच बाहेर काढले!



मुंबई–भारताचा माजी क्रिकेटपटू इरफान पठाण याला अचानक टीम इंडियातून बाहेरचा रस्ता दाखवला गेला. भारताला अनेक शानदार विजय मिळवून देणारा हा ऑलराऊंडर टीम इंडियातून बाहेर का झाला? याचे कारण आतापर्यंत समोर आले नव्हते. आता इरफान पठाणने स्वत: याबद्दल केलेले वक्तव्य चर्चेत आले आहे, ज्यात त्याने टीम इंडियाचा माजी कर्णधार एमएस धोनीवर अनेक गंभीर आरोप केले आहेत.

इरफान पठाण २०१२ पासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून बाहेर झाला, त्यावेळी टीम इंडियाचा कर्णधार एमएस धोनी होता. आता पुन्हा एकदा इरफान पठाणची ५ वर्ष जुनी मुलाखत व्हायरल होत आहे, ज्यात तो एमएस धोनीबद्दल बोलला आहे. धोनीच्या टीममध्ये जाण्यासाठी हुक्का पिणे गरजेचे होते, असा आरोप इरफान पठाणने केला होता.इरफान पठाणे स्पोर्ट्स तकला दिलेल्या मुलाखतीमध्ये धोनीवर आरोप केले. २००८ ऑस्ट्रेलिया दौऱ्यात धोनीने एक वक्तव्य केले होते, ज्यात तो इरफान पठाण चांगली बॉलिंग करत नसल्याचे म्हणाला होता. धोनीच्या या वक्तव्यानंतर आपण स्वत: एमएस धोनीशी बोलायला गेलो, तेव्हा धोनीने असे काही नाही, सगळे प्लानच्या हिशोबाने चालले आहे, असे उत्तर दिल्याचे इरफान म्हणाला.'मला कुणाच्या खोलीमध्ये जाऊन हुक्का लावण्याची सवय नाही. ही गोष्ट सगळ्यांना माहिती आहे, पण तुम्ही याबद्दल बोलला नाहीत तरच चांगले असते. खेळाडूचे काम मैदानात परफॉर्म करणे हे असते आणि मी फक्त याच गोष्टीवर लक्ष द्यायचो', अशी प्रतिक्रिया इरफान पठाणने दिली आहे.

### गोल्फपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी ट्रिनिटी गोल्फ चॅम्पियन्स लीगचे आयोजन

पुणे : भारताचे विश्वचषक विजेते क्रिकेटपटू कपिल देव यांच्या पुढाकाराने व्यावसायिक व हौशी गोल्फ पटूंसह विविध क्षेत्रातील नामवंतांचा सहभाग असलेल्या ट्रिनिटी गोल्फ चॅम्पियन्स लीग (टीजीसीएल) या आगळ्या वेगळ्या सांघिक गोल्फ स्पर्धेचे आयोजन पुण्यातील लवळे येथील ऑक्सफर्ड गोल्फ कोर्स आयोजन येथे करण्यात आले आहे. यावेळी बोलताना कपिल देव म्हणाले की नव्या गोल्फपटूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी या लीगचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण देशभरात गोल्फचा विकास व प्रचार करण्यासाठी तसेच स्पर्धात्मक दर्जा उंचावण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे कपिल देव यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## धोनीने मला शिव्या दिल्या...भारताकडून २ वर्ल्ड कप खेळणाऱ्या खेळाडूचे आरोप



मुंबई–एमएस धोनी याची ओळख भारतीय क्रिकेटमध्ये कॅप्टन कूल म्हणून आहे. कितीही दबाव असला तरी आपल्या शांत स्वभावाने खेळ नियंत्रित करण्याच्या धोनीच्या या शैलीचं भारतामधलेच नाही तर जगातले क्रिकेटपटू कौतुक करतात, पण भारताकडून २ वर्ल्ड कप खेळलेल्या खेळाडूने धोनीवर आरोप केले आहेत. धोनीने मला मैदानामध्ये सगळ्यांसमोर शिव्या दिल्याचं हा क्रिकेटपटू म्हणाला आहे.

भारताकडून ३४ मॅच खेळणाऱ्या मोहित शर्माने एका मुलाखतीमध्ये धोनीसोबत झालेल्या त्या घटनेबद्दल सांगितले आहे. आयपीएलमध्ये मोहित शर्माने त्याची सर्वोत्तम कामगिरी एमएस धोनीच्या नेतृत्वामध्येच चेन्नई सुपर किंग्सकडून केली, त्याचमुळे मोहित शर्मा भारताकडून २०१४ टी–२० वर्ल्ड कप आणि २०१५ चा वनडे वर्ल्ड कप खेळला. मोहित शर्माने टी–२० वर्ल्ड कपमध्ये ३ आणि वनडे वर्ल्ड कपमध्ये ८ मॅच खेळल्या.'माझ्या करिअरमध्ये असे अनेक क्षण आले ज्यात मी धोनीला दबावामध्येही एकदम शांत पाहिले. तो मैदानात भडकेल, याची अपेक्षाही कुणी करत नाही. पण चॅम्पियन्स लीग टी–२० मध्ये केकेआरविरुद्धच्या सामन्यात तो क्षण आला. धोनीने इश्वर पांडेला बॉलिंगसाठी बोलावले, पण मला वाटले त्याने मला बोलावले आहे', असे मोहित शर्मा म्हणाला.

'मी बॉलिंग रन–अप सुरू केला, तेव्हा धोनीने तुला बॉलिंगला बोलावले नाही, असे सांगितले. यानंतर त्याने इश्वर पांडेला बोलावण्याचा प्रयत्न केला, पण अंपायरने मलाच बॉलिंग करणे सुरू ठेवायला सांगितले, कारण मी रन–अप सुरू केला होता. यानंतर धोनी माझ्यावर रागावला आणि त्याने मला शिव्या दिल्या. मी ओव्हरच्या पहिल्याच बॉलला युसूफ पठाणची विकेट घेतली, यानंतर सेलिब्रेशन करत असतानाही तो मला शिव्या देत राहिला', असे वक्तव्य मोहित शर्माने केले आहे. आयपीएलमध्ये धोनी आणि मोहित शर्मा बराच काळ एकत्र खेळले. यानंतर २०२३ मध्ये मोहित शर्माने सीएसकेची साथ सोडून गुजरात टायटन्सकडे जायचा निर्णय घेतला, त्यावर्षी गुजरातची टीम फायनलमध्येही पोहोचली. फायनलमध्ये मोहित शर्माने शेवटची ओव्हर टाकली, पण मोहित शर्माच्या शेवटच्या बॉलवर रवींद्र जडेजाने बाऊंड्री मारून सीएसकेला आयपीएल ट्रॉफी जिंकवून दिली.

## रोहितने तब्बल २० किलो वजन घटवलं, एअरपोर्ट लूक पाहून चाहते फिदा



**नवी दिल्ली:** भारताच्या वनडे संघाचा कर्णधार रोहित शर्माने वजन घटवल्याचा फोटो चांगलाच व्हायरल होत आहे.ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी टीम इंडियाचा संघ लवकरच जाहीर होणार आहे. ही मालिका १९ ऑक्टोबरपासून सुरू होईल. या मालिकेपूर्वी आणि आशिया चषकापूर्वी भारतीय खेळाडूंच्या फिटनेस चाचण्या घेण्यात आल्या होत्या. रोहित शर्मानेही यादरम्यान नवी ब्रॉन्को टेस्ट दिली होती. रोहित शर्माने ही या नव्या चाचणीमध्ये कमालीची कामगिरी केली आहे.रोहित शर्मा ब्रॉन्को टेस्टनंतर मुंबईला परतला तेव्हा विमानतळावर त्याला पाहण्यासाठी नेहमीप्रमाणेच गर्दी होती. यावेळी रोहित शर्मा खूपच फिट दिसत होता. रोहित शर्मा क्रिकेटच्या मैदानावर पुनरागमन करण्यासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी, जेव्हा रोहित शर्मा त्याच्या कुटुंबासह सुट्ट्यांवरून परतला तेव्हा त्याचं वजन फार वाढल्याचं दिसत होतं. त्याचं पोटदेखील सुटलं होतं, पण फक्त काही दिवसांत त्याने २० किलो वजन घटवत फिटनेसच्या चर्चांना पूर्णविराम दिला.रोहित शर्मा गेल्या बऱ्याच काळापासून क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे. २०२४ मध्ये टी–२० आणि २०२५ च्या सुरूवातीला हिटमॅनने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. आयपीएल २०२५ मध्ये रोहित शर्मा अखेरचा क्रिकेटच्या मैदानावर खेळताना दिसला होता. त्यामुळे रोहित शर्माला परत मैदानावर खेळताना पाहण्यासाठी चाहते उत्सुक झाले आहेत. यादरम्यान रोहितच्या फिटनेसबाबत प्रश्न उपस्थित होत असताना हिटमॅनने वजन घटवल्याचे फोटो व्हायरल होत आहेत.रोहित शर्माचं वय आणि त्याचा फिटनेस पाहता तो आगामी वनडे वर्ल्डकपमध्ये खेळणार की नाही, याबाबत सगळीकडेच जोरदार चर्चा होती. दरम्यान रोहित शर्माने २० किलो वजन घटवत त्याच्या फिटनेसच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. रोहित शर्माचा वजन घटवण्यापूर्वीचा आणि नंतरचा फोटो आणि व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रोहितच्या एअरपोर्टवरील लूकवर तर चाहते फिदा झाले आहेत आणि त्यांनी एकापेक्षा एक भन्नाट प्रतिक्रिया दिल्या आहेत.

हिटमॅनचा फिटमॅन अवतार!

रोहित शर्मा आयपीएल २०२५ नंतर त्याच्या कुटुंबासह युरोप दौऱ्यावर सहलीसाठी गेला होता. यानंतर भारतात परतल्यावरचा एअरपोर्टवरील रोहित शर्माचा फोटो आणि आता त्याच्या काही महिन्यांनंतर २० किलो वजन घटवल्यानंतर रोहितचा फोटो व्हायरल होत आहे. चाहतेदेखील या फोटोवर कमेंट करत हिटमॅनचं कौतुक करत आहेत. हिटमॅन वर्ल्डकपसाठी तयार असल्याचं देखील चाहते म्हणताना दिसत आहेत.

ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेसाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली या दिग्गजांचं संघात पुनरागमन होणार आहे. १९, २३ आणि २५ ऑक्टोबरला हे सामने होणार आहेत. याआधी भारतीय अ संघ ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्ध ३० सप्टेंबर, ३ आणि ५ ऑक्टोबर रोजी कानपूर इथे खेळणार आहे. रोहित वनडे मालिकेच्या तयारीचा भाग म्हणून अ संघाकडून खेळणार का हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

# जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा असलेले शहर म्हणून नागपूरची नवीन ओळख – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रिकार्डमध्ये मेट्रोच्या कामठी मार्गावरील डबल डेकर उड्डाणपुलाची नोंद मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वर्ल्ड रेकार्डचे प्रमाणपत्र

**नागपूर/प्रतिनिधी** : महामेट्रोने अल्पावधीत जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचा विकास केल्यामुळे नागपूर या शहराला जागतिक ओळख मिळाली आहे. महामेट्रोने कामठी मार्गावरील सर्वात लांब डबल डेकर पुलाची निर्मिती केली असून या डबल डेकर पुलाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद घेतली आहे. जागतिक दर्जाच्या या पुरस्कारामुळे नागपूर हे जगातील उत्कृष्ट पायाभूत शहर म्हणून नवीन ओळख निर्माण झाली असल्याचे गौरवउद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. या जागतिक पुरस्काराबद्दल महामेट्रोच्या अधिकाऱ्यांना त्यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.

रामगीरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष उपस्थितीत गिनिज वर्ल्ड रेकार्डचे भारतातील प्रतिनिधी स्वप्नील डोंगरीकर यांनी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना गिनिज वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र प्रमाणपत्र प्रदान केले.

कामठी मार्गावरील डबल डेकर व्हायाडक्ट (मेट्रो) हा जगातील डबल डेकर व्हायाडक्ट आहे. मेट्रो व हायवे वाहतुकीसाठी ५.६३७ कि.मी. लांबीचा सिंगल कॉलम पिल्लरवर उभा असून हा स्थापत्य कलेचा अदभूत उदाहरण आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करुन बांधलेल्या या उड्डाणपुलाची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डतर्फे नोंद घेतली आहे. यापुर्वी छत्रपतीनगर येथील ३.२ कि.मी. लांबीच्या डबल डक्ट उड्डाणपुलाची निर्मितीसाठी जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली होती. वास्तुकलेच्या या निर्मितीमुळे संत्राच्या शहरासोबतच पायाभूत सुविधांचे शहर म्हणून नवीन ओळख मिळाली आहे. या पुरस्काराने नागपूरचा गौरव जागतिक स्तरापर्यंत पोहचला आहे. या डबल डेकर पुलाच्या निर्मितीसोबतच कामठी मार्गावर रेल्वे, महामार्ग वाहतूक तसेच मेट्रो वाहतुकीसाठी जागात प्रथमच अशा प्रकारच्या उड्डाणपुल तयार



करण्यात आला आहे. हे जगातील प्रमुख अभियांत्रिकीमधली आश्चर्य आहे. या पुलासाठी १ हजार ६५० टन स्टिलचा वापर करण्यात आला आहे.

जगातील पहिल्या सर्वात लांब डबल डेकर व्हायाडक्ट या पुलाचे सर्व देशांना आकर्षन आहे. प्रत्यक्ष निर्मितीसंदर्भातील माहिती घेण्यासाठी अभियांत्रिकी व वास्तुकलेतील तज्ञ भेट देवून पाहणी करत आहे. अशा प्रकारच्या डबल डेकर पुलांची निर्मिती करणारे महामेट्रो व नागपूर हे पायोनिअर असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

प्रारंभी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. त्यानंतर महामेट्रोतर्फे बांधण्यात आलेल्या भारतातील सर्वात लांब डबल डेकर मेट्रो व्हायाडक्ट या पुलाच्या निर्मितीसंदर्भातील चित्रफित यावेळी दाखविण्यात आली. तंत्रज्ञानाचा अतुलनिय वापर करुन उड्डाणपुलावर गड्डीगोदाम, कडबीचौक, इंदोरा चौक, नारी रोड, ऑटोमोटीव्ह चौक या पाच मेट्रो स्थानके बांधण्यात आली आहे. हा उड्डाणपुल चार पदरी असून पहिल्या स्तरावर महामार्ग, दुसऱ्या स्तरावर मेट्रो आणि जमिन स्तरावर आधीच असलेला महामार्ग आहे. या उड्डाणपुलामुळे कामठी मार्गावरील प्रचंड वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. यापूर्वी छत्रपती चौकाचा समावेश असलेल्या उड्डाणपुलाला देखील गिनिज वर्ल्ड रेकार्डमध्ये समावेश करण्यात आला आहे.

यावेळी महामेट्रोचे संचालक अनिलकुमार कोकाट, प्रकल्प संचालक राजीव त्यागी, कार्यकारी संचालक नरेश गुरबानी, महाव्यवस्थापक यीन राठोड, विद्यासागर व्यवस्थापक प्रविण मारोती, प्रकाश मुदलियार आदी अधिकारी तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील २ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार

**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धरम वीर मीणा यांनी ०२.०९.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे आयोजित एका कार्यक्रमात सोलापूर विभागातील २ मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्कार देऊन गौरविले.

मागील महिन्यात संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्य दरम्यान दाखवलेल्या सतर्कतेबद्दल, अनुचित घटना टाळण्यात आणि रेल्वे वाहतुकीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दाखवलेल्या योगदानाबद्दल सुरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारात पदक, प्रशंसापत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्याबद्दल प्रशस्तिपत्र आणि ₹२०००/- रोख बक्षीस असे असते.

पुरस्कार विजेत्यांचे तपशील

१. श्री मनीष कुमार, तंत्रज्ञ (टीआरडी), कुर्डुवाडी, सोलापूर विभाग, यांना ०६.०७.२०२५ रोजी फूटप्लेट तपासणी दरम्यान बोरीबेल-





मलठन स्थानकादरम्यान २८०/१०-१२ किलोमीटरवर तुटलेला ओएचई जी जंपर दिसला. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला.

२. श्री विकास कुमार पंडित, तंत्रज्ञ (टीआरडी), लातूर, सोलापूर विभाग, यांना २२.०७.२०२५ रोजी हरंगुळ यार्ड येथे तपासणी दरम्यान मालगाडीच्या पेंटोग्राफ मध्ये असामान्य हालचाल दिसली. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली. तपासणी दरम्यान, पेंटोग्राफ स्ट्रिपमध्ये एक खोल खड्डा आढळला. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला. महाव्यवस्थापकांनी आपल्या भाषणात पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कर्तव्यांप्रती असलेल्या सतर्कतेबद्दल आणि समर्पणाबद्दल त्यांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की अशा सतर्कता आणि शौर्याच्या कृतींमुळे इतरांना प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रामाणिकपणे काम करण्यास आणि जीवितहानी, मालवाहतूक आणि रेल्वे मालमत्तेचे नुकसान टाळण्यास प्रेरित केले जाईल. अतिरिक्त महाव्यवस्थापक श्री प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी श्री चंद्र किशोर प्रसाद, इतर प्रमुख विभाग प्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

### सरपंचांनी गावाला आईप्रमाणे सांभाळावे- पेरे पाटील

**चाकूर/प्रतिनिधी** : खरोखरच गाव सुधारावे असे वाटत असेल तर प्रत्येक गावच्या सरपंचाला त्या गावाची आई होऊन विकास करावा लागेल तरच गाव समृद्ध होईल, असे प्रतिपादन छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पाटोदा गावचे सुप्रसिद्ध सरपंच भास्करराव पेरे पाटील यांनी केले. आंबेवाडी (ता. चाकूर) रोजी नवतरुण गणेश मंडळाच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.ॲड. विश्वंभर गुणाले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला अभियंता विश्वनाथ मोतीपोवळे, माजी पंचायत समिती सदस्य राजकुमार राजारुपे, पोलिस उपनिरीक्षक पंकज निळकंठे, माजी सरपंच बसवराज निला, केशव सांगवे, पोलिस पाटील सोपानदेव पाटील आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पेरे पाटील म्हणाले की, ग्रामविकास काळाची गरज असून तो पंचसूत्री कार्यक्रम राबवून यशस्वी करता येतो. त्यांनी मनोरंजनात्मक शैलीत आवश्यक बाबींचा उहापोह केला. गणेश मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

# अज्ञानामुळेच मानवी जीवनात दुःखाचा प्रवेश होतो – भंते डॉ.यश काश्यपायन महास्थवीर

**लातूर/प्रतिनिधी** : अज्ञान हेच मानवाच्या दुःखाचे मूळ कारण आहे.आणि अज्ञानामुळेच मानवाच्या जीवनात दुःखाचा प्रवेश होतो.

त्यासाठी जीवनातील दुःख समजून घेऊन आपल्याला त्याचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. अज्ञान म्हणजे केवळ माहितीचा अभाव नाही, तर आपल्या जीवनातील गोष्टी आणि वास्तवाकडे दुर्लक्ष करणे होय.असे प्रतिपादन भंते डॉ. यश कश्यपायन महास्थवीर यांनी केले.

ते वैशाली बुद्ध विहार बौद्ध नगर लातूर येथे बुद्ध धम्म वर्षावास पुनीत पर्वाच्या निमित्ताने आयोजित धम्मदेशनेच्या कार्यक्रमात बोलत होते.

तत्पूर्वी भगवान बुद्ध व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमाना उपासक-उपासिकांच्या वतीने पुष्प पुष्पमाला अर्पण करून त्रिशरण पंचशील ग्रहण करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विनोद खटके, सुनील कांबळे हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना भंते पुढे म्हणाले कि, माणसाच्या जीवनात दुःख आहे दुःखाला कारण आहे. त्यावर उपाय आहे. दुःखाचा उदयव्यय ही प्रक्रिया अखंड चालू आहे. अज्ञानामुळे दुःख उत्पन्न होते म्हणून या दुःखाला दूर करण्यासाठी आर्य अष्टांगिक मार्ग बुद्धांनी सांगितलेला आहे.

त्याचे आचरण करून दुःखाला दूर करा आज आणि उद्या भगवान बुद्धाचा विचार जगाला आवश्यक आहे. त्यामुळेच बुद्धाला डॉक्टरांचे – डॉक्टर म्हटले आहे. ते पुढे म्हणाले कि, अज्ञानामुळे मानवी जीवनात दुःख आहे त्याला कारण आहे घराघरात आई –मुलगा मुलगा –वडील गावा – गावात राज्या– राज्यात देशा –देशात कलह आहे. हा कलह आजचा नाही तर भूतकाळात होता आजही आहे. उद्याही राहणार आहे.त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे कि, विश्वात जो पर्यन्त सूर्य, चंद्र आहे. तोपर्यंत मानवी जग जिवंत राहायचे असेल तर बुद्धाच्या विचाराची कास धरावी लागेल अन्यथा हा कलह या मानवी जीवनाचे काय करेल ते सांगता येत नाही. याकरिता वैराची आवश्यकता नसून मंगल मैत्रीची गरज असल्याचेही आपल्या धम्मदेशनेत भंते कश्यपायन यांनी नमूद केले.

यावेळी विनोद खटके, सुनील कांबळे यांच्या हस्ते दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व सुप्रिया सातपुते या समाजशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल बुद्ध पुस्तिका स्मृतीचिन्ह व पुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी भरत कांबळे, सूर्यभान लातूरकर, किशोर कांबळे, कुमार सोनकांबळे, साहित्यिक जी जी कांबळे, आबा गायकवाड, दामू कोरडे, अशोकराव सातपुते, वसंत वाघमारे, उत्तम गायकवाड, राजू कांबळे, असित कांबळे, शकुंतला नेत्रगावकर,



शीलाताई वाघमारे, मीना सुरवसे, अनुराधा कांबळे, लता गायकवाड, लता कांबळे, आशा बानाटे, आशा गायकवाड, सविता चिकाटे, शारदा वाघमारे, छाया कांबळे इत्यादी उपासक- उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केशव कांबळे यांनी केले. तर टि. एस कवठेकर यांनी भोजनदान दिले.शेवटी धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## शिरोळ येथे भटक्या व विमुक्त जाती दिनानिमित्त शिबिर






**निलंगा/प्रतिनिधी** : निलंगा तालुक्यातील शिरोळ (वा.) येथे भटक्या व विमुक्त जाती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मंडळ अधिकारी अमोल सोमवंशी, ग्राम महसूल अधिकारी विष्णु पोचापुरे, वस्ती प्रमुख शिवाजी मोरे, बालाजी चव्हाण, सुमित मोरे, वाघमारे विश्वनाथ, उषा क्षीरसागर, पवार ताण्याबाई, मंजुळे अण्णाराव, सुरेश गिरी, लक्ष्मण क्षीरसागर, बंडगर काशीबाई, धडे मोहन, रामकिशन जाधव, केशव जाधव, जाधव विनोद, पत्रकार मारोती जाधव, महा ई सेवा केंद्राचे रावजादे कैलाश, किशोर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या माध्यमातून रहिवासी दाखला, उत्पन्न दाखला, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, केंद्र शासन जातपडताळणी पत्र, आधार कार्ड, रेशन कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, शेतकरी कार्ड, ७/१२ उतारा इत्यादी विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या प्रमाणपत्रांचे वाटप मंडळ अधिकारी अंबुलगा (बु.) व ग्राम महसुल अधिकारी शिरोळ वा. यांच्या हस्ते करण्यात आले.

## लातूरच्या वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळातर्फे रक्तदान शिबीर; उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी** : वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने शहरात नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक बांधिलकीतून प्रेरित होऊन मंडळाने या उपक्रमाचे आयोजन केले होते. याशिवाय, रक्तदान ही काळाची महत्वाची गरज आहे असा संदेश यावेळी देण्यात आला.

या रक्तदान शिबिरामध्ये युवक-युवती, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. शिबिरा दरम्यान एकूण २३ पिशव्या रक्तसंचयन करण्यात आले. या उपक्रमात भालचंद्र रक्तपेढीच्या सहकार्याने योग्य त्या वैद्यकीय सुविधा पुरवण्यात आल्या. रक्तदात्यांना प्रमाणपत्र व उपहार देण्यात आले. मंडळाच्या वतीने पर्यावरणस्नेही उपक्रमांबरोबरच समाजोपयोगी कार्यांनाही प्राधान्य दिले जात असल्याचे मंडळाने सांगितले. शहरातील इतर गणेश मंडळांनाही अशा सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मंडळाने यावेळी केले. विशेषत: अंजली ड्रायव्हर पॉईंट येथील चालकांनी रक्तदान मध्ये सहभाग नोंदवला.

## बप्पा गणेश मंडळाचे पथनाट्य !

**लातूर/प्रतिनिधी** : नवा नरक ''वाहतुकीच्या नियमावर जणजागृती'' तसेच सोशल मीडियाच्या प्रादुर्भावावर मुलांमध्ये जनजागरण समाज, संस्कृती, आध्यत्म, आरोग्य आणि शिक्षण या पंचसुत्रीवर जणजागृती करणारा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट गणेश मंडळ ''उत्सवाचा मानबिंदू'' असलेल्या लातूरच्या बप्पा गणेश मंडळाच्या वतीने वाहतूक नियमांची जनजागृती करणारे ''नवा नरक'' पथनाट्य शहरातील विविध भागांमध्ये सादर केले जात असून नागरिकांच्या / विद्यार्थी मित्रांच्या कौतुकास पात्र ठरत आहे.यमाची भूमिका साकारणारे मंडळाचे उपाध्यक्ष कुमार चोथवे तर चित्रगुप्ताची भूमिका साकारणारे शिवदर्शन राचट्टे हे आहेत !बप्पा गणेश मंडळ हा उत्सवाचा मानबिंदू असून सातत्याने सामाजिक उपक्रम राबवत आलेला आहे.






# एसटी महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींचा त्वरित वापर करण्यास मान्यता: परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी** :राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी. महामंडळ) ताब्यातील अतिरिक्त जमिनींच्या व्यापारी तत्त्वावर वापरासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सार्वजनिक –खाजगी भागिदारीतुन विकसित होणाऱ्या प्रकल्पाच्या भाडेपट्टीची मुदत ही ६० वर्षावरून ९८ वर्षापर्यंत वाढवण्यात आली आहे.यामुळे एस.टी.महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक स्थैर्य साधण्यास मदत होणार आहे,असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, सरकारच्या सुधारित धोरणानुसार, एसटी कडील अतिरिक्त जमिनींचा विकास सार्वजनिक-खाजगी सहभाग () पद्धतीने करण्यात येणार असून त्यासाठीची भाडेपट्टा कालमर्यादा ४९ वर्षे + ४९ वर्षे अशी एकूण ९८ वर्षे इतकी असेल. या कालावधीत संबंधित जमिनींचा व्यापारी वापर करून मिळणाऱ्या उत्पन्नाचा / व्यापारी क्षेत्राचा ठराविक हिस्सा एसटी महामंडळाला जमा करणे बंधनकारक असेल.

तसेच,मुंबई महानगरातील एसटीच्या जागांचा विकास आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी आणि महामंडळाच्या शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी डी.सी.पी. आर.-२०३४ व यु.डी.सी.पी.आर.-२०२० नुसार व्यापारी वापरास परवानगी दिली जाणार आहे.



या निर्णयामुळे महामंडळाच्या ताब्यातील निष्क्रिय जमीन उपयुक्त वापरात आणली जाईल, नव्या प्रकल्पांना चालना मिळेल तसेच एस.टी. महामंडळाला मोठा आर्थिक फायदा होऊन प्रवाशांना दर्जेदार सेवा पुरविण्यास मदत होईल.

**–प्रताप सरनाईक**
**परिवहन मंत्री**


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# मध्य रेल्वेच्या १० कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार (सेफ्टी अवॉर्ड) प्रदान

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांनी दि. ०२.०९.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या १० कर्मचाऱ्यांचा ज्यामध्ये मुंबई विभागातून ६, सोलापूर विभागातून २ आणि नागपूर आणि पुणे विभागातून प्रत्येकी १ कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार देऊन सन्मानित केले.

कर्तव्यादरम्यान संबंधित कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या सतर्कतेबद्दल, अनुचित घटना टाळण्यात आणि मागील महिन्यांत रेल्वे वाहतुकीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल संरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय संरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्र आणि रु २०००/- रोख बक्षीस यांचा समावेश आहे.




**पुरस्कार विजेत्यांचे तपशील:**

**मुंबई विभाग:**

१. श्री एन. प्रसाद, मोटरमन, कल्याण, मुंबई विभाग, ३०.०७.२०२५ रोजी खोपोली लोकल (केपी-१) वर काम करत असताना, किमी ७४/२६ वर एक असामान्य धक्का जाणवला आणि त्यांनी ट्रेन थांबवली. बारकाईने तपासणी केली असता रूळाचे तुटलेले टोक (हेड) आढळले. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली ज्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळता आली.

२. श्री गणेश कुमार, ट्रेन मॅनेजर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई विभाग, दिनांक ३१.०७.२०२५ रोजी डोंबिवली लोकल (DL-10) वर कार्यरत असताना, किमी ४१/० येथे एक ट्रॅक मेंटेनर हात हलवत धावत येत असताना दिसला. धोका ओळखून श्री गणेश कुमार यांनी तात्काळ उपाययोजना करून डाउन जलद मार्गावर येत असलेल्या कल्याण लोकल क्रमांक घ-७१ ला थांबवले. ट्रॅक मेंटेनरने दिवा - मुंब्रा मार्गावरील किलोमीटर ४१/० येथे रुळ तुटलेले (Rail Fracture) असल्याचे शोधले होते. श्री गणेश कुमार यांच्या सतर्कतेमुळे आणि वेगवान निर्णयक्षमतेमुळे एक संभाव्य अपघात टळला.

३. श्री विनोद काळू म्हात्रे, ट्रॅक मेंटेनर, कल्याण, मुंबई विभाग यांनी ३१.०७.२०२५ रोजी ड्युटीवर असताना दिवा-मुंब्रा विभागात किमी ४१/० येथे रेल्वे रुळाला तडा (रेल फ्रॅक्चर) गेल्याचे आढळले. त्यांनी तात्काळ रुळाचे संरक्षण करण्यासाठी पावले उचलून संबंधित सर्वांना माहिती दिली, ज्यामुळे संभाव्य अपघात टळला.

४. श्री नरेश वसंत घारे, ट्रॅक मेंटेनर, कर्जत, मुंबई विभाग यांनी १९.०६.२०२५ रोजी पावसाळी गस्ती दरम्यान रुळांच्या रचनेत विस्थापन झाल्याचे निदर्शनास आणले. त्यांनी तात्काळ रुळाचे संरक्षण करण्यासाठी पावले उचलून संबंधित सर्वांना माहिती दिली, ज्यामुळे संभाव्य अपघात टळला.

५. श्री राम अनंत मुने, ट्रॅक मेंटेनर, नेरळ, मुंबई विभाग यांनी ०३.०७.२०२५ रोजी ड्युटीवर असताना बदलापूर- वांगणी विभागात किमी ७७/१४ येथे रेल्वे रुळाला तडा (रेल फ्रॅक्चर) गेल्याचे आढळले. त्यांनी तात्काळ रुळाचे संरक्षण करण्यासाठी पावले उचलून संबंधित सर्वांना माहिती दिली, ज्यामुळे संभाव्य अपघात टळला.

६. श्री विशाल बनसोडे, इलेक्ट्रिक सिग्नल मेंटेनर (ESM), कळवा, मुंबई विभाग, २६.०६.२०२५ रोजी सिग्नल मेंटेनन्स ड्युटीवर असताना, त्यांना किमी ३६/१४० वर रेल्वेला तडे गेल्याचे आढळले. त्यांनी तात्काळ पावले उचलली आणि संबंधित सर्वांना माहिती दिली ज्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळता आली.

**सोलापूर विभाग**

७. श्री मनीष कुमार, तंत्रज्ञ (टीआरडी), कुर्डुवाडी, सोलापूर विभाग, यांनी ०६.०७.२०२५ रोजी फूट प्लेट तपासणी दरम्यान, बोरीबेल- मलठण विभागातील किमी २८०/१०-१२ वर ओव्हर हेड इक्विपमेंट (ओएचई) चा जी-जंपर तुटलेला आढळला. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली ज्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळता आली.

८. श्री विकास कुमार पंडित, तंत्रज्ञ (टीआरडी), लातूर, सोलापूर विभाग, यांनी हरंगुल यार्ड येथे दि. २२.०७.२०२५ रोजी तपासणी दरम्यान एका मालगाडीच्या पेंटोग्राफची असामान्य हालचाल लक्षात आली. बारकाईने तपासणी केल्यावर पेंटोग्राफ प्लेटवर मोठा खड्डा असल्याचे आढळून आले. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली ज्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळता आली.

**नागपूर विभाग**

९. श्री निलेश, पॉइंट्समन, माळखेड, नागपूर विभाग यांनी ०१.०८.२०२५ रोजी ड्युटीवर असताना, मालगाडीशी सिग्नलची देवाणघेवाण करताना, एका वॅगनमध्ये हॉट ॲक्सल असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ लाल झेंडा दाखवून स्टेशन मास्टरांना माहिती दिली. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला.

**पुणे विभाग**

१०. दि. १५.०८.२०२५ रोजी दौंड, पुणे विभागातील तंत्रज्ञ (सी अँड डब्ल्यू) श्री विश्वामित्र कुमार यादव यांना एका मालगाडीच्या रोलिंग तपासणी दरम्यान एका वॅगनच्या सीबीसी कपलिंगमध्ये काहीतरी असामान्य आढळले. बारकाईने तपासणीत तुटलेला योक आढळून आला. त्यांनी ताबडतोब सर्व संबंधितांना कळवले.

पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करताना आणि त्यांच्या सतर्कतेबरोबरच कर्तव्यनिष्ठेची प्रशंसा करताना महाव्यवस्थापक म्हणाले की, अशा प्रकारच्या सतर्कता आणि निष्ठेच्या कृतीमुळे इतरांनाही प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची प्रेरणा मिळेल तसेच जीवितहानी, मालहानी आणि रेल्वे संपत्तीचे नुकसान टळेल.

या प्रसंगी श्री प्रतीक गोस्वामी, अतिरिक्त महाव्यवस्थापक, श्री चंद्र किशोर प्रसाद, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी, इतर प्रधान विभागप्रमुख तसेच मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## श्री मन्मथ स्वामी सप्ताहाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील आझाद चौक परिसरातील श्री पाचशेघर मठ संस्थान येथे प्रतिवर्षाप्रमाणे श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामींच्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री मन्मथ स्वामी सप्ताहाचा शुभारंभ दि. ०८ सप्टेंबर २०२५ वार सोमवार रोजी रात्री ११.०५ वा . होऊन टाळ, आरती दि. १५ सप्टेंबर २०२५ वार सोमवार रोजी रात्री ११:५५ वा. होणार आहे. दि. १८ सप्टेंबर २०२५ वार गुरुवार सकाळी ६.३० वा. श्री ची पालखी मिरवणूक पारंपारिक मार्गाने निघून सायंकाळी ६.०० वा. श्री पाचशे घर मठामध्ये आरती व प्रसादाने सांगता होईल. श्री सप्ताह कालावधीत विविध धार्मिक, सामाजिक, रुद्रपठन, प्रवचन, भजन, संगीत भजन, किर्तन, भारुड वगैरे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री पाचशेघर मठ संस्थानच्या वतीने विश्वस्त मंडळ, श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी सप्ताह समिती, पुरुष व महिला भजनी मंडळ, भक्त व अनुयायी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रेणापूर येथील धुमाकूळ घालणाऱ्या वानरांचा आ. कराड यांनी सूचना देताच केला बंदोबस्त

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर शहर व परिसरात गेल्या काही दिवसांपासून वानरांच्या टोळीने धुमाकुळ घातल्याने नागरिकात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. वन्य प्राण्याकडून कुठलाही अनर्थ घडू नये यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी वन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. आ. कराड यांच्या सूचनेची दखल घेऊन रेणापूर शहर आणि परिसरातील वानरांना पकडून वन विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जेरबंद केले आहे.




रेणापूर शहर परिसरातील बसस्थानकाच्या पाठीमागील संभाजी नगर, संजय नगर व बाजार पेठेत गेल्या काही दिवसापासून दहा ते बारा वानरांच्या या टोळीने चांगलाच धुमाकूळ घातला. या वानरांनी आक्रमक होत हल्ला करून दहशत निर्माण केली. घराच्या छतावरून उडी मारून साहित्याची नासधूस करणे, हाकलण्यासाठी आलेल्या महिला व पुरुषांच्या अंगावर धावून येणे. यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते या सर्व प्रकाराची माहिती मिळताच लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना वानराचा बंदोबस्त करावा अशा सूचना दिल्या.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेची तात्काळ दखल घेऊन वन विभागाचे वन परिमंडळ अधिकारी सहदेव पांचाळ, वनरक्षक तुकाराम दिघोळे, यांच्यासह विश्वनाथ मुंडे, नारायण चेपट, अंगद धायगुडे, लिंबराज जाधव, नागनाथ खाडप, कृष्णाजी घोडके, श्रीमंत चेपट, बळीराम शिंदे, समाधान बनसोडे, शिवाजी कांबळे व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या पथकाने कार्यतत्परता दाखवून रेणापूर शहर आणि परिसरातील धुमाकूळ घालणाऱ्या अनेक वानरांना पकडून त्यांना जेरबंद केले आहे सदरील कारवाई झाल्याने रेणापूर येथील ग्रामस्थात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रेणापूर तालुक्यातील अनेक गावात वन्यप्राण्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत असून अशावेळी तातडीने वन्य प्राण्याचा बंदोबस्त व्हावा यासाठी रेणापूर येथे वनपरिमंडळाचे कार्यालय कार्यान्वित व्हावे यासाठी राज्याचे वनमंत्री गणेशजी नाईक यांच्याकडे मागणी करणार असल्याची माहिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी दिली.

## उदगिरकरांचा बाप्पाला जल्लोषात निरोप

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर शहरात दरवर्षीच्या परंपरेनुसार गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाल्यानंतर सातव्या दिवशी म्हणजेच मंगळवारी (२ सप्टेंबर) आपल्या लाडक्या बाप्पाला गणपती बाप्पा मोरया या, पुढच्या वर्षी लवकर या, या जयघोषात, जल्लोषात व ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीसह बाप्पांना हर्षोउल्हासात भावपूर्ण निरोप देण्यात आला. शहरातील एकुण ६० परवाना धारक गणेश मंडळांनी श्रीची प्रतिष्ठापना केली होती. नवसाला पावणारा गणपती म्हणून ओळख असलेला व मानाचा मानला जाणारा आजोबा गणपती ची प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही सर्वप्रथम प्रशासनाच्या वतीने माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते सकाळी ११ : ३० वाजता आरती करण्यात आली. व जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते विसर्जन मिरवणुकीचे पूजन करुन विसर्जनास सुरुवात करण्यात आली. तर शहरातील परवाना धारक गणेश मंडळाचे विसर्जन त्यानंतर सुरूवात झाली.यावेळी लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर घुगे, लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, पो.नि.राजकुमार पुजारी, पो. नि.दिलीप गाडे यांच्यासह विविध समाजातील व धर्मातील मान्यवरांची उपस्थिती होती.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


## सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी विजयकुमार घोगरे यांच्या निवासस्थानी दिली सांत्वनपर भेट

**अहमदपूर/प्रतिनिधी :** मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा आंदोलनाच्या लढ्यात प्राण गमावलेल्या मराठा सेवक स्वर्गीय विजयकुमार घोगरे यांच्या टाकळगाव का. येथील निवासस्थानी राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी सांत्वनपर भेट दिली. यावेळी त्यांच्या कुटुंबीयांना धीर देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी त्यांनी दिलेले हे सर्वोच्च बलिदान मराठा समाज कायम स्मरणात ठेवील. त्यांच्या कुटुंबीयांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी माझा सर्वतोपरी प्रयत्न असेल अशी ग्वाही त्यांनी घोगरे कुटुंबीयांना दिली. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पानगावातील स्मशानभूमीच्या रस्त्याची मोजणी: अखेर गुरुवारी रस्त्याचा सुटणार प्रश्न, स्मशानभूमी व रस्ता हद्दीच्या खुणा देणार करुन

**रेणापूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील पानगाव येथील पाच समाजाच्या एकत्रित स्मशानभूमीत जाण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून होणारी गैरसोय दूर करण्यासाठी तहसील कार्यालय रेणापूर यांच्या वतीने दि. २ रोजी स्मशानभूमी असलेल्या गट नंबर १० ची मोजणी करण्यात आली. रस्त्यासाठी व स्मशान भूमीसाठी दि. ४ रोजी गुरुवारी हद्दी खुणा करुन रस्ता मोकळा करुन देणार असल्याची माहिती मंडळ अधिकारी कमलाकर तिडके यांनी दिली. रेणापूर तालुक्यातील पानगाव हे जवळपास २० ते २५ हजार लोकसंख्येचे मोठ्या बाजार पेठेचे ठिकाण असून या ठिकाणी गट नंबर १० मध्ये स्मशानभूमी साठी ९ गुंठे जागा असून ही स्मशानभूमी लिंगायत ,माळी, न्हावी,मराठा, जंगम या पाच समाजाची एकत्रित स्मशानभूमी आहे. या स्मशानभुमीला जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे भर पावसाळ्यात होणारी समस्या गेल्या १०० वर्षांपासून कायम होती. लातूर ग्रामीणचे आ. रमेश कराड यांनी रेणापूर येथे घेतलेल्या जनता दरबारात हा प्रश्न समाजाच्या वतीने मांडण्यात आला होता. तसेच महात्मा बसवेश्वर संस्थानच्या वतीने सततच्या पाठपुरावा केला. पानगाव या ठिकाणी पंचकुंड महादेव मंदीर जवळ असलेल्या पाच समाजासाठीच्या स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची समस्या कायम असल्याने हा प्रश्न लवकरात लवकर सुटावा अशी सर्व समाज बांधवांची अपेक्षा होती. परंतू प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रस्ता मिळाला नसल्यामुळे अनेक दिवसांपासून या समाजाला अंत्यविधीसाठी संघर्ष सुरुच होता. दरम्यान बुधवारी दि. २७ रोजी एका महिलेचा मृत्यू झाला. तीन दिवसांपासून पावसाची झड सुरु होती स्मशानभूमीत रस्ता नसल्यामुळे सर्वत्र चिखल झाला होता. स्मशानभूमीत जाण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे हे प्रेत रेणापूर तहसील कार्यालय येथे नेऊन अंत्यसंस्काराचा इशारा दिला होता.

## उपोषण सुटे ..

लिंबू पाण्या सन्मान
उपोषणा सुखे सोडे
शुष्क घसे आसुसले
प्राशनकरे थोडे थोडे

त्रस्तावला झुंडा पुंडा
योध्दा जो सतत लढे
आवरा रे अभ्यागता
उगेआपले नाव जोडे

उपोषणकर्ता दिसेना
बाकीचे करी पुढेपुढे
सुवर्ण क्षण मानकरी
कोणबुवा संधी सोडे

व्यासपीठ हबकलेले
स्टेजवरी झुंबड ओढे
उपोषणकर्ता उपाशी
इतरेजण ठोसती पेढे

गुदमरुन गेला बेचारा
भेटण्यास झुंबड उडे
दिवस अ विस्मरणीय
आसमंती गुलाल उडे

उपोषण कर्ता शांतते
तो हात जोडे गर्दीपुढे
शुध्द अंमलबजावणी
काम खरे अजून पुढे

बापुंची आठवण येते
यशस्वी होई शांत लढे
एक वारसा अभिमाने
असाचं न्यावा पुढे पुढे

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी विद्यार्थ्यांनी वाङ्मय मंडळ, ग्रंथालयाशी नाळ जोडावी

### उदयगिरी महाविद्यालयातील कार्यक्रमात गीतकार नाईकवाडे यांचे प्रतिपादन



**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन मंगळवारी (२ सप्टेंबर) गीतकार सतीश नाईकवाडे यांच्या हस्ते संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के होते. मंचावर माजी आ. प्रा. मनोहर पटवारी, अमोल जाधव, प्रा. ज्ञानेश्वर हंडरगुळीकर, अभय भांगे, विभागप्रमुख प्रा. डॉ. दीपक चिद्रवार, प्रा. डॉ. बी. आर. दहिफळे, प्रा. डॉ. ए. पी. मोरे आणि प्रा. गोविंद खराबे उपस्थित होते.

माजी विद्यार्थ्यांचा शाल व ग्रंथ भेट देऊन गौरव करण्यात आला. गीतकार सतीश नाईकवाडे म्हणाले की विद्यार्थ्यांनी ग्रंथालय व वाङ्मय मंडळाचा उपयोग करून आपले व्यक्तिमत्व घडवावे. महाविद्यालयाचे वातावरण सर्वधर्मसमभावाची शिकवण देणारे आहे. सुसज्ज ग्रंथालय ज्ञानवर्धन करणारे आहे. माणूस घडवण्याचे काम महाविद्यालयाने केले आहे. या ग्रंथालयामुळे मला मराठीची गोडी लागली. शरणकुमार लिंबाळे, प्रा. ई. सोनकांबळे, नामदेव ढसाळ यांच्या साहित्यवाचनामुळे माझ्या मनात विद्रोही काव्य निर्माण झाले. प्रा. ज्ञानेश्वर हंडरगुळीकर म्हणाले की भाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो. मातृभाषा ही ज्ञानाचे प्रवेशद्वार आहे. मातृभाषा नीट समजली नाही तर इतर भाषाही नीट शिकता येत नाहीत. भाषेवर प्रेम केले नाही तर भाषा लयाला जाईल. त्यामुळे भाषेचे जतन करा, वाचन वाढवा आणि ग्रंथालयाचा वापर करा. अमोल जाधव व अभय भांगे यांनी आपल्या जडणघडणीत मराठी विभागाचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. राजकुमार मस्के यांनी विद्यार्थ्यांनी साहित्याच्या माध्यमातून आपल्या प्रतिभेला वळण द्यावे असे सांगितले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सोलापूर विभागातील चहाच्या स्टॉल्स आणि एमपीएस स्टॉल्सचा ई-लिलाव**

सोलापूर विभागातील ए.बी आणि डी.ई. श्रेणीतील स्टेशन्सवर केटरिंग स्टॉल्स (एमपीएस आणि चहाच्या स्टॉल्स) च्या ऑपरेशनसाठी कंत्राट वाटपासाठी ई-लिलावासाठी २६.०८.२०२५ आणि २८.०८.२०२५ रोजीची निविदा सूचना कृपया येथे संलग्न केली आहे. **अनु.क्र: १. लिलाव कॅटलॉग क्रमांक: एसयूआर-सीएटीजी-२५-१९, तारीख: ०१.०९.२०२५. लिलाव सुरू,बंद,तारीख आणि वेळ: प्रारंभ-दुपारी १२.०० वा, १०.०९.२०२५. बंद-दुपारी १३.४० वा, १०.०९.२०२५. स्थानकांचे नाव:** खालील स्टेशन्सवरील चहाच्या स्टॉल्सचा ई-लिलाव. १. मोहोल २. दुधाणी ३. माढा. ४. मॉडेल लिंब. ५.कुर्डुवाडी. ६.लातूर. ७.अराग. ८.भिगवान. **क्रमांक: २. लिलाव कॅटलॉग क्रमांक: सुर-एमपीएस-२५-२, तारीख:** ०१.०९.२०२५. **लिलाव सुरू,बंद,तारीख आणि वेळ: सकाळी ११.०० वा., १२.०९.२०२५. सकाळी ११.३० वा., १२.०९.२०२५. स्थानकांचे नाव:** सोलापूर स्टेशनवरील एमपीएस स्टॉलचा ई-लिलाव. वरील दोन्ही निविदांच्या: पद्धत: ireps ई-लिलाव (लीज मॉड्यूल) द्वारे ई-लिलाव. **वरील दोन्ही निविदांच्या: निविदा कालावधी:** वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी १०% वाढीसह ५ वर्षे. **वेबसाइट पत्ता:** सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल https://www.ireps.gov.in/ वर उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी सहभागींनी वेबसाइटला भेट द्यावी अशी विनंती आहे. DE/Sur-60

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६